रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २४७
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, २५ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

**अंतरंग**

'पेण खारेपाटातील पाणीटंचाईवर उपाययोजना करणार'/२
पीएम आवास : पोलादपूरमध्ये ७५० घरांची निर्मिती होणार/५
इरा, प्रकाश, प्रणित यांची सॉफ्ट टेनिस संघात निवड/८

## राज्यात जिवंत सातबारा विशेष मोहीम राबवली जाणार



**मुंबई :** मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये न झाल्याने विविध अडचणींना सामोरे जावे लागते. या अडचणींचे निराकरण तातडीने व्हावे यादृष्टीने महसूल विभागामार्फत जिवंत सातबारा विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत निवेदन केले. १ एप्रिल २०२५पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिवंत सातबारा मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेंतर्गत मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये अद्यावत करुन मयत खातेदारांच्या वारसाची नोंदींचे कामकाज पूर्ण करण्यात येणार आहे, असेही निवेदनात महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# प्रशांत कोरटकरला अटक

## तेलंगणातून पोलिसांनी घेतले ताब्यात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकावणारा प्रशांत कोरटकर याला पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. पोलिसांनी तेलंगणा येथून कोरटकर याला ताब्यात घेतले आहे.



इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकावणारा आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारा प्रशांत कोरटकर याच्यावर कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. कोल्हापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज रद्द केल्याने जुना राजवाडा पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला होता. अटकेच्या भीतीने तो दुबईला पळाल्याची चर्चा प्रसारमाध्यमांमध्ये सुरू होती, मात्र दुबईतील त्याचे हे फोटो जुने असल्याचे नंतर समोर आले.

प्रशांत कोरटकरविरोधात नागपूर, कोल्हापूर व जालना येथे गुन्हे दाखल झाले आहेत. न्यायालयाने अटकपूर्व जामीन दिल्यानंतरदेखील कोरटकर समोर आला नव्हता. त्याचा जामीन फेटाळल्यानंतर त्याला अटक करण्यासाठी कोल्हापूर येथील पोलिसांचे पथक नागपुरात पोहोचले, मात्र, त्याच्या निवासस्थानी तो आढळला नाही. पोलीस पथकाने चंद्रपूर तसेच मध्य प्रदेशमध्ये त्याचा शोध घेतला. नागपूर सायबर पोलीस ठाण्याचीदेखील मदत घेण्यात आली होती.

चंद्रपुरातील एका हॉटेलमध्ये प्रशांत कोरटकर मुक्कामी होता. त्यामुळे कोल्हापूर पोलिसांनी चंद्रपुरात छापा घातला, मात्र काही तासांपूर्वीच त्याला पोलिसांबाबत माहिती मिळाल्याने तो पळून गेला. कोरटकर ज्या वाहनातून तो फिरत होता त्या वाहनाच्या मागावर कोल्हापूर पोलिसांचे एक पथक होते.

कोरटकरने चंद्रपुरातून एका क्रिकेट बुकीच्या कारने पळ काढला. त्यानंतर काही अंतरावर गेल्यानंतर त्याने दुसऱ्या वाहनातून प्रवास सुरू केला. त्यामुळे कोल्हापूर पोलिसांना तपासात अडचणी आल्या. अखेर कोल्हापूर पोलिसांना दुसऱ्या वाहनाचादेखील शोध लागल्याने तेलंगणा येथे जाऊन कोरटकरला बेड्या ठोकण्यात आल्या.

# बँक चालवणाऱ्यांनीच बुडवली, तर त्यात ठेवीदारांचा काय दोष?

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा विधीमंडळ अधिवेशनात सवाल

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील खातेदार आणि गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याबाबत विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल झाला होता. या विषयावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना एखादी बँक जर चालवणाऱ्यांनीच बुडवली, तर त्यात ठेवीदारांचा काय दोष आहे, असा सवाल उपस्थित करीत सभागृहाचे लक्ष वेधले.



पेण अर्बन बँकेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्यासाठी रिझर्व्ह बँक आणि निर्बंध या संदर्भामध्ये राज्याच्या सहकार खात्याने अधिक सक्रियपणे काम केले पाहिजे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत करीत ठेवीदारांना ठेवी परत मिळण्यासाठी या प्रश्नावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला.

एखादी बँक चालवणाऱ्यांनीच बुडवली त्यात ठेवीदारांचा काय दोष आहे, अशी विचारणा करीत कायद्याच्या कचाट्यामध्ये ठेवीदारांनी किती काळ अडकून रहायचे, असा सवाल उपस्थित केला. १४ वर्षे निघून गेली. त्यामुळे या सगळ्या प्रक्रिया वेगवान करणे आणि ठेवीदारांना न्याय मिळवून देणे शासनाची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने जलद पद्धतीने कार्यवाही होण्यासाठी रिझर्व्ह बँक आणि निर्बंधांमध्ये राज्याच्या सहकार खात्याने अधिक तत्परतेने यामध्ये पुढाकार घेऊन ठेवीदारांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले होते की, महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम १९९९ कलम ४ (१) आणि कलम ५ (१) अन्वये या मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, पेण यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सक्षम प्राधिकारी यांनी महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम १९९९चे अंतर्गत बँकेच्या ठेवीतून खरेदी केलेल्या एकूण ४७ मिळकती २४ जुलै २०१३ रोजी जप्त केल्या आहेत तसेच बँकेच्या निधीतून खरेदी केलेल्या उर्वरित आठ मालमत्ता व संचालकांच्या ९६ मालमत्ता २१ जून २०१८ रोजी जप्त केल्या आहेत. सक्षम प्राधिकारी यांनी विशेष सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग यांच्या न्यायालयात स्पेशल केस नं. (१/२०११)मध्ये जप्तीचा आदेश स्थायी व अंतिम करण्यासाठी अर्ज व प्रतिज्ञापत्र दाखल केले असून १७ फेब्रुवारी २०१४ रोजी जप्त केलेल्या ३१ मालमत्तांवरील जप्तीचा आदेश कायम करण्यात आला आहे. सक्तवसुली संचालनालय, मुंबई यांच्याकडून बँकेच्या पैशातून खरेदी केलेल्या मिळकतींवर नोंद करण्यात आलेला बोजा कमी करून संबंधित मिळकती सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे कागदोपत्री ताब्यात देण्यात आल्या असून अद्याप कोणतीही रक्कम सक्षम प्राधिकारी अथवा बँकेकडे वर्ग करण्यात आलेली नाही. रिझर्व्ह बँकेने पेण अर्बन को-ऑप बँकेचा परवाना रद्द केला असला तरी या बँकेसंदर्भात उच्च न्यायालयात याचिका न्यायप्रविष्ट असल्याने ही बँक अवसायनात घेण्याची प्रक्रीया अद्याप होऊ शकलेली नाही तसेच रिझर्व्ह बँकेने पेण अर्बन बँकेवर लागू केलेल्या निर्बंधामुळे ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करता येत नाहीत.

या प्रकरणाबाबत सुमारे १.४४ लाख ठेवीदारांचा विचार करता विशेष बाब म्हणून ठेवीदारांच्या विमा संरक्षित रक्कमा तातडीने अदा करण्याबाबत रिझर्व्ह बँक तसेच डीआयसीजीसीला आवश्यक ते निर्देश देण्याबाबत केंद्रीय राज्यमंत्री (वित्त) यांना मंत्री (सहकार) यांच्या स्तरावरून ३० डिसेंबर २०२२च्या पत्राने विनंती करण्यात आली आहे. बँकेने आजपर्यंत विविध माध्यमांतून रिझर्व्ह बँक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे व उच्च न्यायालय मुंबई यांच्या मान्यतेने ३८,५९४ ठेवीदारांना ५८.९१ कोटी रकमेचे वाटप केले आहे, असेही लेखी उत्तरात मंत्री पाटील यांनी म्हटले आहे.

# स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या वादग्रस्त गाण्याचे सर्वत्र पडसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा स्वीकार केला जाईल, पण स्वातंत्र्याचा स्वैराचार करण्याचा अधिकार कुणालाही नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अपमानित करणाऱ्या कॉमेडियन कुणाल कामरा यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. सुपारी घेऊन बोलणाऱ्यांना धडा शिकवावा लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदेंबद्दल यांच्यावर आक्षेपार्ह गाणे सादर करून त्यांची खिल्ली उडवली आहे. त्यामुळे संतापलेल्या शिवसैनिकांनी खार येथील स्टुडिओ रविवारी रात्री फोडला. या प्रकरणी १९ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दुसरीकडे कॉमेडियन कुणाल कामराला अटक



करण्याची मागणी शिवसैनिकांनी केली आहे. या प्रकाराचे पडसाद सोमवारी (दि. २४) विधानसभेतही उमटले.

### सुपारी घेऊन बोलणाऱ्यांना धडा शिकवणार -मुख्यमंत्री

यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, स्टँडअप कॉमेडीच्या नावाखाली अयोग्य काही सहन करणार नाही. स्वातंत्र्याचा स्वैराचार झाला तर पुढच्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य स्वैराचाराकडे जात असेल तर ते वाईट आहे. २०२४च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने ठरवून दिले की, कोण खुद्दार आणि कोण गद्दार आहे. हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसदार कोण हे महाराष्ट्राच्या जनतेने ठरवलेले आहे. असे असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाणूनबुजून बदनाम करण्यासाठी हे केले जात असेल तर ते योग्य नाही.

कुणाल कामराने राहुल गांधींनी दाखवलेले लाल कव्हरचे संविधान पुस्तक पोस्ट केले आहे. दोघांनीही संविधान वाचलेले नाही. संविधान आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य देते, परंतु त्याला मर्यादा आहेत. विनोद निर्माण करता येतो, मात्र अपमानास्पद विधाने करणे स्वीकारता येत नाही. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यावर आणि विचारसरणीवर अतिक्रमण करता येत नाही. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून न्याय्य ठरू शकत नाही. राजकीय कॉमेडी करा, व्यंग करा, पण प्रसिद्धीसाठी जर कोणी अपमानित करत असेल, तर त्याच्यांवर कडक कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### टोलनाक्यावर डंपरने गाड्यांना चिरडले, दोन जणांचा मृत्यू

**डेहरादून :** अनियंत्रित झालेल्या डंपरने डेहरादून-हरिद्वार महामार्गावरील लच्छीवाला टोलनाक्यावर समोरील काही गाड्यांना अक्षरशः चिरडले. यामध्ये एका कारचा तर चेंदामेंदा होऊन दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी डंपरचालकाला ताब्यात घेतले आहे. दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

### न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या बदलीची शिफारस

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना त्यांच्या मूळ अलाहाबाद उच्च न्यायालयात परत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील प्रस्ताव सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने वेबसाईटवर प्रसिद्ध करून बदलीच्या शिफारशीची पुष्टी केली आहे. या निर्णयाला अलाहाबाद उच्च न्यायालय बार असोसिएशनने आक्षेप घेतला आहे.

# बीसीटी लॉ कॉलेजमधील राष्ट्रीय स्पर्धेचे बक्षीस वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात शास्त्रार्थ या आशयाखाली राष्ट्रीय पर्यावरण कायदा वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २३) झाला.

या स्पर्धेत देशभरातील अनेक संघांनी सहभाग घेतला आणि पर्यावरण कायद्याच्या क्षेत्रातील आपली कौशल्ये प्रदर्शित केली. स्पर्धेत विद्यार्थ्यांना पर्यावरणीय समस्यांवर सखोल चर्चा करण्याची आणि त्यांचे कायदेशीर कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळाली. स्पर्धेचा सेमी फायनल आणि फायनल राऊंड रविवारी झाला. ॲड. उदय वरुंजेकर, ॲड. संजीव सावंत, न्यायमूर्ती उमेश साल्वी, न्यायमूर्ती अभय थिप्से यांनी स्पर्धेचे मूल्यांकन केले.

स्पर्धेत मुंबईतील के. सी. कॉलेजचा संघ विजयी झाला असून त्यांना २५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. पुण्यातील क्राइस्ट युनिव्हर्सिटीने द्वितीय क्रमांक पटकावला त्यांना १५ हजार रुपये आणि सन्मानचिन देऊन सन्मानित करण्यात आले. सर्वोत्कृष्ट मेमोरियल नागपूरमधील एमएलयु कॉलेज, सर्वोत्कृष्ट मुटर्स म्हणून के.सी. कॉलेजची रोजिना कोंटिन्हो, तर सर्वोत्कृष्ट संशोधक म्हणून वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या अनन्या जॉय यांना प्रत्येकी १० हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाला संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव एस.टी. गडदे, प्राचार्य सानवी देशमुख, समन्वयक धनश्री कदम, न्यायमूर्ती उमेश साल्वी, न्यायमूर्ती अभय थिप्से यांच्यासह प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाईंना मरणोत्तर 'भारतरत्न' देण्याचा ठराव विधानसभेत मंजूर

**मंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे यासाठी केंद्र सरकारला शिफारस करण्याचा ठराव मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत मांडला. या ठरावाला सदस्य छगन भुजबळ यांनी पाठिंबा दर्शवला. दरम्यान, हा ठराव विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आला.



या ठरावावर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार आनंद व्यक्त केला. क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंना देशाचा सर्वोच्च भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. याचा ठराव विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलाय. हा ठराव पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्राच्या लौकिकात भर घालणारा आहे. संपूर्ण देशवासीयांच्या लोकभावनेचा आदर करणारा हा ठराव सर्वांनुमते मंजूर करणाऱ्या सर्व विधीमंडळातील सदस्यांचे उपमुख्यमंत्री पवार यांनी आभार मानले.

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात सुरू केली होती. त्यांच्या त्या कार्यामुळे स्त्रीशक्तीला शिक्षणाची दारे खुली झाली.

# पनवेलमधील विहीघर येथे रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील विहीघर गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे एमएमआरडीएच्या माध्यमातून ६० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यानुसार या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि. २४) झाले.

पनवेल तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून सातत्यापूर्ण पाठपुरावा सुरूच असतो. त्यानुसार विहीघर गावातील महादेव फडके यांच्या घरापासून ते मरीआई मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. हे काम एमएमआरडीएच्या ६० लाख रुपयांच्या निधीतून होणार असून निधी मंजूर करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठपुरावा केला होता.

भूमिपूजन समारंभास भाजपचे तालुका सचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, अल्पसंख्याक सेलचे अकबर सय्यद, भाजप नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, तालुका चिटणीस यतीन पाटील, माजी पं.स. सदस्य राज पाटील, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, बुथ अध्यक्ष अभय पाटील, सुरेश फडके, रोहित पाटील, हनुमान फुलोरे, रमेश पाटील, नितीन राऊत, मुकेश फडके, ज्ञानेश्वर फडके, बबन फडके, गजानन पाटील, शंकर फडके, मिन्नात पाटील, सागर पाटील, सोमनाथ पाटील, कृष्णा पाटील, सुरेश फडके, रमेश फडके, सुधीर फडके, सुरेश पाटील, साईनाथ पाटील, विष्णू पाटील, जनार्दन पाटील, अशोक फडके, अनंता पाटील, रवींद्र पाटील, नितीन पाटील, ओमकार फडके, जयदास पाटील, जयदास फडके, माजी सरपंच अनंता फडके, महादू फडके, रामदास पाटील, संकेत पाटील, संदेश फडके, जयनाथ पाटील, राकेश फडके, संतोष हरड, नरेश फडके, श्रीधर पाटील, वेद फडके, नितीन पाटील, दीपक पाटील, सोमानथ फडके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या वेळी गावातील महिलांनी समाजमंदिर आणि पाण्याच्या प्रश्न उपस्थित केला असता भाजप नेते अरुणशेठ भगत यांनी मे महिन्यात समाजमंदिराच्या भूमिपूजनाचा नारळ फुटेल, अशी ग्वाही दिली तसेच येत्या महिनाभरात जल जीवन मिशनचे काम सुरू होऊन पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असे आश्वासन दिले.

## अल्पवयीन मुलगी प्रसूत

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलाने अल्पवयीन मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवून वारंवार अत्याचार केला. यामध्ये पीडित मुलगी गर्भवती राहून तिची नुकतीच अलिबागच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात प्रसुती झाली.

याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, पेणमधील घोटे येथे मामाकडे आपल्या आजारी आईबरोबर आलेल्या १६ वर्षांच्या मुलीवर आरोपी गवशा उर्फ नितीन दामू वाघ (वय २५) वर्ष याने अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून नराधमाला पोलिसांनी अटक केली आहे.

## 'सुएसो'च्या अध्यक्षपदी गीता पालरेचा बिनविरोध

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी गीता पालरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीनंतर पालरेचा यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



गेल्या अनेक दशकांपासून सुधागड एज्युकेशन सोसायटी रायगड जिल्ह्यासह नवी मुंबईत ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांनी सन १९४१मध्ये लावलेल्या या शिक्षण संस्थारूपी रोपट्याचे रूपांतर आता वटवृक्षात झालेले आहे. लिमये यांनी वसंत ओसवाल यांच्यावर त्या काळी अत्यंत विश्वासाने सोपवलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे व तत्परतेने बजावली. ओसवाल यांच्या निधनानंतर पद रिक्त होते. अध्यक्ष व सचिवपदासाठी रविवारी (दि.२३) संस्थेच्या संचालक मंडळाची बैठक झाली. या वेळी बहुमताने गीता पालरेचा यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर सचिवपदी ग.रा. म्हात्रे यांचीही बिनविरोध निवड झाली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. दादासाहेब लिमये यांनी वसंत ओसवाल यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी जशी प्रामाणिकपणे सांभाळली त्याचप्रमाणे संचालक मंडळाने विश्वासाने माझ्यावर सोपविलेल्या जबाबदारीचे मी संस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र लिमये यांच्या सोबतीने प्रामाणिक व पारदर्शकपणे काम करीन, अशी ग्वाही नवनियुक्त अध्यक्ष गीता पालरेचा यांनी दिली.

# पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयास २५ लाखांची वैद्यकीय उपकरणे भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे सोमवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमात डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेलला जवळपास २५ लाखांची विविध वैद्यकीय उपकरणे भेट म्हणून देण्यात आली. यामुळे रुग्णालयाला मदत झाली असून रुग्णांना वेळेवर व जलद उपचार करणे सोपे जाणार आहे.



डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान हे सामाजिक कार्यासाठी ओळखले जाते. राज्यभरात विविध कार्यक्रम सदस्यांतर्फे वर्षभर राबवले जात असतात. यासह पर्यावरण क्षेत्रातदेखील प्रतिष्ठानचे मोठे कार्य असून लाखो वृक्ष प्रतिष्ठानतर्फे लावले गेले आहे तसेच स्वच्छता मोहिमेत देखील अग्रेसर असतात. असे विविध सामाजिक कार्यक्रम राबवले जात असताना, रुग्णांसाठी देखील प्रतिष्ठानने पुढाकार घेतला आहे. तब्बल २५ लाखांची विविध साधने,वैद्यकीय उपकरणे पनवेल उपजिल्हा रुग्णालयास भेट देण्यात आली.

या कार्यक्रमास शेकडो सदस्यांसहित पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवाजी पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक गीते, रायगड अध्यक्ष रायगड मेडिकल असोसिएशनचे डॉ. निशिगंध आठवले, पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ. वैभव मोकल, इंडियन मेडिकल असोसिएशन पनवेलचे डॉ. अभय शेटे हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. याबद्दल आभार मानण्यात आले.

# सोशल मीडियावर नोकरी शोधणाऱ्या तरुणीची साडेतीन लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

सोशल मीडियावर नोकरी शोधणे कामोठे शहरातील एका तरुणीला तब्बल तीन लाख ५७ लाखाला पडले आहे. या प्रकरणी कामोठे पोलिस ठाण्यात पाच जणांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे येथे राहणारी एक गृहिणी असून घरातील काम करताना वेळ जावा म्हणून ती गेल्या काही दिवसापासून नोकरीच्या शोधात होती. ही नोकरी ती सोशल मीडियाच्या माध्यमातून शोधत होती. मात्र हेच सोशल मिडिया योगितासाठी चांगले महागात पडले आहे. तीने स्वतःच्या फेसबुकवर खात्यावर वर्क फॉर्म होमची जाहिरात पाहिली होती. ती जाहिरात पहिल्या नंतर, तीने त्या जाहिरातीची लिंक ओपन केल्या नंतर तिला जॉब प्रोफाईल आला. त्यानुसार तिने सगळी माहिती त्यात भरली.

ती माहिती भरल्यानंतर, तिला व्हिडीओ लाईक करून त्या व्हिडिओचे स्क्रिन शॉट पाठवण्याची माहिती देण्यात आली. त्यानुसार तीने ते व्हिडीओ पाहून लाईक करून त्याचे स्क्रीन शॉट पाठवले आणि अवघ्या काही तासातच याचा मोबदला म्हणून तिला १२० रुपये मिळाले. हे १२० रुपये प्राप्त झाल्या नंतर, सोशल मिडियावरील व्यक्ती देत असलेली कामे ती करू लागली. त्या बदल्यात तिला अनुक्रमे २०० हून अधिक पैसे मिळत गेले. त्यानंतर तिला एक टास्क देण्यात आला, त्या टास्कमध्ये ऑनलाइन ट्रेडिंगची माहिती दिली. त्या ट्रेडिंगमध्ये तिने गुंतवलेल्या १ हजारांच्या मोबदल्यात तिला १ हजार ३०० रुपयाचा नफा झालेला मोबदला दाखवण्यात आला. हे पाहून तीने, समोरील व्यक्तीने ट्रेडिंगच्या नावाखाली दिल्या वेगवगेळ्या खात्यात ३ लाख ५७ हजार रुपये पाठवले. ट्रेडिंगमध्ये गुंतवलेल्या या रकमेचा मोबदला म्हणून तिला ४ लाख ८० हजाराचा नफा दिसून आला.

तिने ही रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, मात्र ही रक्कम काही केल्या खात्यावरून निघत नव्हती, याचे कारण विचारल्यानंतर तुमचा क्रेडिट स्कोअर कमी आहे. असे कारण सांगून अधिक रक्कम भरल्यानंतर ही रक्कम मिळेल अशी माहिती दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तीने त्याबाबत कामोठे सायबर सेलला पाच जणांविरोधात तक्रार दाखल केली आहे.



**पनवेल : मनसेच्या सुधागड पाली महिला तालुका अध्यक्ष हर्षदा शिंदे यांनी भाजप कामगार संघटनेमध्ये जाहीर प्रवेश केला असून त्यांची भाजप माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियनच्या सुधागड पाली अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातील नियुक्तीपत्र माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी देण्यात आले. या वेळी त्यांनी हर्षदा शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, सरचिटणीस अनिल खोपडे आदी उपस्थित होते.**

## तरुणाची आत्महत्या

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील करंबेळी येथील २२ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

२२ वर्षीय तरुणाने उंदीर मारण्याचे विषारी औषध पिऊन २१ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास आत्महत्या केली. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे औषध उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी २२ मार्च रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या कोपर (गव्हाण) शाळेतील शिक्षिका कल्पना भगत यांना नारीशक्ती पुरस्कार नुकताच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते देण्यात आल्याबद्दल शाळेचे चेअरमन अनंतशेठ ठाकूर, माजी उपसरपंच विजय घरत यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

# सीकेटी महाविद्यालयात जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेचे दिमाखदार आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुणांचे राष्ट्र म्हणून समग्र विश्वात भारत देशाची ख्याती आहे. याच देशातील युवकांना देशातील संसदीय शासन प्रणाली, विधीनिर्मिती प्रक्रिया आणि विकसित भारताबाबत असणाऱ्या बहुविध परीपेक्ष्याचे विवेचन करण्यासाठी भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयासोबतच्या सामंजस्य करारान्वये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) ची रायगड जिल्ह्याचे नोडल सेंटर म्हणून निवड झाली असून, अनुक्रमे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे रायगड जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेचे महाविद्यालयाच्या संकुलात दि. २१ आणि २२ मार्च २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते

सदर स्पर्धेच्या नोंदणीची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने माय भारत पोर्टलच्या माध्यमातून करण्यात आली होती. ज्यामध्ये What does Viksit Bharat mean to you ? या विषयवार ०१ मिनिटाचा व्हिडीओ बनवून तो उपरोक्त पोर्टलवर अपलोड करावयाचा होता. यानंतर स्क्रीनिंग समितीने सर्व व्हिडीओ ची तपासणी करून पात्र स्पर्धकांना ऑफलाईन स्पर्धेकरिता निमंत्रित करण्यात



आले होते.

प्रस्तुत स्पर्धेचा उद्घाटन समारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्ह्याचे युवा अधिकारी मा. श्री. निशांत रौटेला, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा. टी. पी. मोकल, कीर्ती महाविद्यालय दादर च्या सार्वजनिक धोरण विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रमोहन जोशी, काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे डॉ. धवल शाह, युवा नेते अभिषेक भोपी यांची उपस्थिती लाभली.

रायगड जिल्ह्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. टी. पी. मोकल यांनी सीकेटी महाविद्यालयाशी असणाऱ्या ऋणानुबंधाचा उल्लेख करत, रायगड जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेच्या दिमाखदार नियोजन तथा आयोजनाबाबत कौतुक करत सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कीर्ती महाविद्यालय दादर च्या सार्वजनिक धोरण विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रमोहन जोशी यांनी सहभगी स्पर्धकांना संबोधित करत विकसित भारताची संकल्पना समजावून सांगत मूल्यमापनाचे निकष उद्धृत केले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले.

जान्हवी हातमोडे (सीकेटी महाविद्यालय), संयोगी नाईक, प्रिया चौधरी (सीकेटी महाविद्यालय), सी.एन.एस. मनस्विनी, ढोमसे नेहा, गुप्ता कामया, तुपे घनश्याम, पाटील आकांक्षा (सीकेटी महाविद्यालय), साळुंखे प्रणव, मोटे समृद्धी या १० स्पर्धकांची निवड महाराष्ट्र राज्यस्तरीय फेरीसाठी निवड झाली आहे.

# मोटरसायकल चोरणारे दोन आरोपी अटकेत; उरण पोलिसांची कारवाई

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

मोटार सायकल चोरी करणारे दोन आरोपी जेरबंद उरण पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्या कडील ६ मोटार

सायकल जप्त केल्या करुन आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे .

उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे प्रकटीकरण

पथकाचे अधिकारी सपोनि नितीन खाडे ,पो उपनिरीक्षक संजय राठोड व पथक यांनी तात्रिक माहितीच्या आधारे

आरोपी.१) शरद भारत सांगोलकर वय –२९ रा. साईबाबा मंदिर पाठीमागे नवघर जिल्हा रायगड , मुळगाव पत्ता – लोणारवाडी वाकीघेरडी ,तालुका सांगोल जिल्हा सोलापूर ,

२)संजय तमा निमगरे वय –३४




वर्षे धंदा शेती ,रा. नवघर तालुका उरण जिल्हा रायगड यांना अटक केली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे . आरोपी हे वेअर

हाउसिंगच्या भिंती लगत बाहेरील बाजूस पार्क केलेल्या मोटार सायकलची चोरी करीत असत .त्यांच्याकडून ०६ मोटरसायकली असा १ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांतर्फे हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस उपयुक्त परिमंडळ २,पनवेल सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग नवी मुंबई विशालनेहूल ,उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकजितेंद्र मिसाळ यांचे मार्गदर्शनाखाली,उरण पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन खाडे ,पोउपनिसंजय राठोड , पोलीस हवालदार आदींनी केली याबाबत अधिक तपास व कार्यवाही सुरु असल्याचे जितेंद्र मिसाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सांगितले आहे.

## पार्क केलेल्या वाहनाची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

रस्तावर पार्क करून ठेवलेली चार चाकी चोरीला गेल्याची घटना कामोठे सेक्टर ६ मध्ये घडल्याची घटना उघड झाली आहे.या चार चाकीमध्ये असलेली एक लाखाची रोख रक्कम तसेच गाडीच्या डीक्कीत ठेवलेला एसी देखील चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.

## पत्रकार संजय कदम यांना शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका प्रेस क्लबचे सदस्य व रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या ३० वर्षांच्या पत्रकारीता आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्यावतीने व्यवसाय सेवा पुरस्कार आणि शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पनवेल शहरातील सिंधी पंचायत सभागृह येथे हा सोहळा संपन्न झाला. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल तर्फे दरवर्षी व्यवसाय करतानाच समाजासाठी काम करणार्या एखाद्या सेवाभावी व्यक्तीला व्यावसायिक सेवा पुरस्कार प्रदान करण्यात येत असतो. पनवेल तालुका प्रेस क्लबचे सदस्य व रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या ३० वर्षांच्या पत्रकारीता आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत रोटरी ३१३१ चे जिल्हा गव्हर्नर शीतल शाह यांच्या हस्ते व्यवसाय सेवा पुरस्कार आणि शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्कार ने त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी रोटरी जिल्हा प्रथम महिला रागिणी शाह, सहाय्यक गव्हर्नर डॉ. किरण कल्याणकर, पीडीजी डॉ. गिरीश गुणे, अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, रोटेरियन आणि अनस, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल सदस्य उपस्थित होते.



# केदार भगत यांनी घडविले महिलांना कार्ला दर्शन

**पनवेल : वार्ताहर**

भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत आणि केदार भगत मित्र परिवार यांनी पनवेल शहरातील प्रभाग १९मधील महिलांना मोफत कार्ला दर्शन घडवले. या वेळी महिलांनी युवा नेते केदार भगत यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आशीर्वाद मिळण्याचे साकडे आई एकवीरा चरणी घातले.




पनवेल शहरातील प्रभाग १९मधील महिलांना रविवारी (दि. २३) कार्ला येथील एकविरा देवीच्या दर्शन व एक दिवसीय सहलीसाठी नेण्यात आले. शहरातील गावदेवी मंदिरासमोरुन सहलीच्या बसेस आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून सोडण्यात आल्या. या सहलीत महिलांसाठी हळदीकूंकू, संगीत खुर्ची व उखाणे असे विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करून विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. डीजेच्या तालवर नृत्य करण्याचा आनंददेखील महिलांनी घेतला. महिला दिनाचे औचित्य साधून स्त्रीत्वाला सलाम आणि मातृत्वाला वंदन करून ही सहल आयोजित करण्यात आली होती.

या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, विशाल सावंत, प्रशांत शेट्ये, सचिन भगत, अभिजीत साखरे आदी उपस्थित होते. उपक्रम यशस्वी करण्यासाठी केदार भगत व त्यांच्या मित्र परिवाराने विशेष मेहनत घेतली.

## कामावर गेलेला बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षा घेऊन कामावर जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



संतोष पुंडलिक हरिहर (४३ रा.छोटा खांदा गाव) असे या इसमाचे नाव असून उंची ५ फुट, रंग गोरा, चेहरा उभट, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, दाढी बारीक कोरलेली, डाव्या हातावर जुन्या ब्लेडने मारल्याच्या खुणा, मध्यम बांधा असून अंगात ग्रीन रंगाचा टी–शर्ट व लाईट ब्ल्यू रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. पो.हवा.एच.एस.शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# चौकशीतून संशय मिटावा

जनतेचा देशातील एकंदरच व्यवस्थेवरील विश्वास टिकवायचा असेल तर न्यायव्यवस्थेवरील विश्वासाला अजिबात धक्का लागता कामा नये असे मानले जाते. त्यामुळेच दिल्ली उच्च न्यायालयातील न्या. यशवंत वर्मा यांच्या घरी आग लागली असता तेथे गेलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांना कथितरित्या कोट्यवधी रुपयांची रोकड अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडणे हे त्यामुळेच सगळ्यांनाच अस्वस्थ करणारे प्रकरण आहे. सखोल चौकशी होऊन यातील सत्य बाहेर येईलच, पण न्यायव्यवस्थेविषयी संशयाचे वातावरण निर्माण होणेही हिताचे नाहीच.

**दिल्ली उच्च न्यायालयातील न्या. यशवंत वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानी काही कोटींची रोकड सापडली ही बातमी कुणाही सुजाण नागरिकाला अस्वस्थ करेल अशीच. न्या. वर्मा हे घरी उपस्थित नसताना त्यांच्या घरी आग लागली आणि आग विझवायला तिथे पोहचलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांना तिथे अर्धवट जळालेल्या पाचशे रुपयांच्या नोटांनी भरलेली अनेक पोती दिसली. या प्रकरणात एका मागोमाग एक घडलेल्या घडामोडी चक्रावून टाकणाऱ्या आहेत. जळालेल्या नोटा तिथे सापडल्याचे जगजाहीर होताच आधी न्या. वर्मा यांची त्यांच्या मूळ अलाहाबाद न्यायालयात बदली करण्यात आल्याचे वृत्त आले. इतक्या गंभीर प्रकरणात ही एवढीच कारवाई अशी प्रतिक्रिया त्यामुळे समाजमाध्यमांवर स्वाभाविकपणे उमटली. त्यानंतर या प्रकरणाची कसून चौकशी करण्याची मागणी सर्व स्तरातून होत असतानाच, न्या. वर्मा यांनी स्वाभाविकपणे हा आपल्या बदनामीचा कट असल्याचा दावा करीत घरातील आगीत जळालेल्या नोटा सापडल्याचे वा नोटांनी भरलेली ती पोती नंतर अन्यत्र हलवल्याचे नाकारले. संबंधित सर्व आरोपांचे त्यांनी आपल्या निवेदनात खंडन केले. दरम्यान, ही रक्कम १५ कोटी रुपयांच्या घरात असल्याचेही म्हटले गेले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या प्रमुखांनी न्या. वर्मा यांच्या घरी रोकड सापडलेली नाही असे विधान केल्याचे वृत्त आले आणि नंतर लगेचच त्यांनी मी तसे बोललोच नाही असा खुलासाही केला. हा काय गोंधळ सुरू आहे असा प्रश्नच या प्रकाराने निर्माण झाला, परंतु त्यानंतर याप्रकरणीचा दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा अहवाल तसेच घटनेचा थेट व्हिडिओ व छायाचित्रे सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर जारी करण्यात आली. अशा तऱ्हेने माहिती जाहीर करणे आजवर कधी घडलेले नाही असे सांगितले जाते, परंतु सर्वोच्च न्यायालयाने पारदर्शीपणा राखण्याकरिता केलेल्या या अनपेक्षित कृतीचे अनेक कायदेतज्ज्ञांनी व ज्येष्ठ वकिलांनी स्वागत केले आहे. आगीच्या संबंधित घटनेत नेमके काय सापडले आहे हे आता लोकांना थेट पाहता येईल. अर्थात, प्राथमिक निष्कर्षांची सखोल चौकशी होण्याची गरज आहे असे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. देवेंद्रकुमार उपाध्याय यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. त्यानुसार सरन्यायाधीशांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. शील नागू, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जी. एस. संधावालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अनु शिवरमन यांचा समावेश करून तीन सदस्यीय चौकशी समिती या प्रकरणी स्थापन केली आहे. न्या. वर्मा यांना कोणतेही न्यायालयीन कार्य न सोपवण्याचे आदेशही न्या. उपाध्याय यांनी दिले आहेत हेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. हेही योग्यच म्हटले पाहिजे. या संपूर्ण प्रकरणामुळे न्यायाधीशांविरोधातली अंतर्गत चौकशी खरोखरच कितपत प्रभावी ठरते याविषयीची चर्चाही पुन्हा एकदा सुरू झाली आहे.**

# वाघ्या कुत्र्यावरून वाद अन् मजारीकडे दुर्लक्ष





**खबरबात**
**महेश शिंदे**


कोकणचे भाग्य बदलणाऱ्या कोकण रेल्वे आणि मुंबई-गोवा महामार्ग यापासून महाड तालुक्यातील विकास साधण्याचा प्रयत्न जरी झाला असला तरी आजही रेल्वेचा फायदा महाडकरांना होताना दिसत नाही, तर महामार्गाची रचना करताना अधिकाऱ्यांनी व तज्ज्ञांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांचा इतिहासाचा विचार केलेला दिसत नाही, मात्र वहूर या गावात असलेल्या एका अनधिकृत मदारीवर मात्र प्रशासन का मेहरबान झाले हे समजणे सामान्यजनांच्या पलीकडे आहे. दरम्यान, किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीशेजारील वाघ्या कुत्र्याची वास्तू हटवण्यासाठी छत्रपती संभाजीराजे आग्रही आहेत. याच ठिकाणी महामार्गावर असलेल्या अनधिकृत मजारीकडे दुर्लक्ष केले जात आहे.

महाराष्ट्राच्या जनतेवर अनन्वित अत्याचार करणारा, झिझिया कर लावून जनतेची आर्थिक पिळवणूक करणारा क्रूर शासक औरंगजेब याची छत्रपती संभाजीनगरमधील कबर हटवण्यासाठी आंदोलन उभे राहत आहे, मात्र ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी समस्त मुघल, निजाम, विजापूर सल्तनत तसेच ब्रिटिशांविरोधात स्वातंत्र्याचा लढा उभा करून स्वराज्याची निर्मिती केली त्यांच्या स्वराज्याच्या भूमीत किल्ले रायगडकडे जाणाऱ्या महामार्गावर वहूर (ता. महाड) या गावामध्ये एक अधिकृत मजार महामार्गाच्या मधोमध उभारली गेलेली आहे. विशेष म्हणजे मजारीला धक्का न लावता दोन्ही बाजूने मार्ग वळविण्यात आला आहे. एवढे कमी की काय या मजारीची नव्याने दुरुस्ती करून सुशोभीकरण करून दिले आहे.

किल्ले रायगडावरील शिवछत्रपतींच्या समाधीशेजारी असलेल्या कथित वाघ्या कुत्र्याची प्रतिमा पाठविण्यासाठी प्रस्तुत राजे घराण्याचे वंशज संभाजीराजे कोल्हापूरकर हे पुढाकार घेत असून नुकतेच त्यांनी या प्रकरणी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून आपली तळमळ व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, शिवरायांच्या जीवनात असा कोणताच वाघ्या कुत्रा नव्हता. कारस्थान करून महाराजांच्या समाधीशेजारी, समाधीचा अपमान करण्याच्या हेतू हे शिल्प उभारले गेले आहे. त्यांचे हे म्हणणे जरी खरे असले तरी आज कित्येक वर्ष आबालवृद्ध व्यक्ती, तरुण व शालेय विद्यार्थी या समाधीवर जात असतात व समाधीचे दर्शन घेत असतात, मात्र वाघ्या कुत्र्याच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचा कुणालाच कधीच आक्षेप नव्हता. नसणारे भांडण उकरून काढण्याचा प्रकार या ठिकाणी होताना दिसत असून भविष्यात मोठा संघर्ष उभा राहण्याची शक्यता आहे आणि हा संघर्ष दुसऱ्या कोणामध्ये नसून शिवभक्तांमध्येच होणार आहे. दहा वर्षांपूर्वी असाच संघर्ष याच वाघ्या कुत्र्याच्या कारणामुळे या ठिकाणी झाला होता. जवळपास एक महिना किल्ला सर्वसामान्य शिवभक्तांसाठी बंद ठेवण्यात आला होता. तोच प्रकार पुन्हा घडतो काय याची भीती वाटू लागली आहे.

छत्रपती शिवराय महाराजांचे गडकोट, किल्ले हेच त्यांची खरी स्मारके आहेत. ही स्मारके जपण्याचे काम महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रामाणिकपणे करीत आहे. देवाभाऊंच्या निदर्शनास जर का ही बाब आली तर ते नक्कीच या ठिकाणी बुलडोझर चालवून ही अनधिकृत मजार हटवतील यात तीळमात्र मात्र शंका नाही.

# भारतातील आघाडीचे शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर



वसंत रणछोड गोवारीकर हे भारतातील आघाडीचे शास्त्रज्ञ होते. ते इ.स. १९९१ ते इ.स. १९९३ या काळात भारताच्या पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार होते. वसंत गोवारीकर इ.स. १९९४ ते इ.स. २००० या काळात मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष होते. ते ज्ञान प्रबोधिनी संस्थेशी दीर्घ काळ निगडित होते. हराळी येथील ज्ञान प्रबोधिनीच्या शाळेतील विज्ञान प्रयोगशाळेला डॉ. गोवारीकरांचे नाव देण्यात आले आहे.

वसंत रणछोडदास गोवारीकर यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील इंजिनिअर होते. गोवारीकरांचे शालेय शिक्षण कोल्हापुरातल्या हरिहर विद्यालय व सिटी हायस्कूल या शाळांत झाले. कोल्हापुरातल्या राजाराम कॉलेजातून त्यांनी बीएस्सी आणि सैद्धान्तिक भौतिकीमध्ये एमएस्सी पूर्ण केले.

यानंतर रसायन अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्यासाठी ते लंडनला रवाना झाले. १९५९ ते १९६७ या काळात लंडनमधील बर्मिंगहॅम विद्यापीठातून त्यांनी त्या विषयातील मास्टर्स आणि डॉक्टरेट या पदव्या प्राप्त केल्या.

यानंतर प्रथम त्यांनी हार्व्हेल येथील ॲटॉमिक एनर्जी रिसर्च एस्टॅब्लिशमेंटमध्ये आणि नंतर ब्रिटिश मिनिस्ट्री ऑफ एव्हिएशनच्या समरफील्ड रिसर्च स्टेशन येथे, संशोधन केले. त्याचदरम्यान डॉ. गोवारीकर यांनी ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांच्या काही परीक्षांसाठी बाह्य-परीक्षक म्हणून काम पाहिले आणि परगॅमॉनच्या संपादक मंडळाचे सदस्य या नात्याने अनेक वैज्ञानिक पुस्तकांचे संपादनही केले.

वसंतरावांचे शालेय व बीएस्सीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरात झाले. काही नोकऱ्या करून बाह्य शिक्षण पद्धतीने त्यांनी एमएस्सी पूर्ण केले. एमएस्सीनंतर इंग्लंड येथे त्यांनी प्रा. गार्नर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवाही पदार्थावरील पीएचडी अवघ्या दोन वर्षांत पूर्ण केली. त्या वेळी अनेक पाठ्यपुस्तकांत गार्नर-गोवारीकर थिअरीचा समावेश झाला. वयाच्या २८व्या वर्षी केंब्रिज, ऑक्सफर्डमध्ये डॉक्टरेटसाठी परीक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली आणि पुढे अमेरिकेत समरफिल्ड रिसर्च सेंटरमध्ये क्षेपणास्त्रातील मीटरचे संशोधन करण्यासाठी त्यांना सन्मानाने बोलवून घेण्यात आले.

१९६५ साली टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेमध्ये वसंतराव व विक्रम साराभाई उपग्रह तंत्रज्ञानावर काम करू लागले. त्याचे फलित म्हणजे पॉलिमर केमिस्ट्रीमध्ये आज ते अव्वल समजले जातात. ते नंतर त्रिवेंद्रमला थुंबा येथील अवकाश संशोधन प्रयोगशाळेचे प्रमुख झाले. या सर्व श्रमाचे सार्थक म्हणजे १७ एप्रिल १९८३ रोजी त्यांच्या नेतृत्वाखाली एसएलव्ही -३ हा उपग्रह वाहक कार्यान्वित झाला.

काही काळ ते विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव होते. १९९१ ते १९९३ या दरम्यान ते पंतप्रधानांचे विज्ञान सल्लागार होते. त्यांच्या नेतृत्वाखाली हवामानाचा अंदाज, तंत्रज्ञांना उद्योजक बनवण्याच्या योजना, परदेशस्थ भारतीय संशेधकांना परत आणणे, सरकारचे विज्ञान धोरण ठरविणे व त्याचा प्रसार करणे ही कामे प्रामुख्याने झाली. पुढे काही वर्षे ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते, तसेच खतांच्या विश्र्वकोश प्रकल्पाचे कामही त्यांनी नुकतेच पूर्ण केले आहे. १९९४-२००० या दरम्यान गोवारीकरांनी मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्षपदही भूषवले.

अनेक पुस्तके व शेकडो विज्ञान निबंध त्यांच्या नावावर आहेत. 'आय प्रेडिक्ट' हे भारतीय लोकसंख्येवरील भाष्य करणारे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. पद्मश्री, फाय फाउंडेशन पारितोषिक, नायक सुवर्णपदक, अनेक विद्यापीठांच्या डॉक्टरेट्स असे मानसन्मान त्यांना मिळाले आहेत. सध्या ते महाराष्ट्र राज्याच्या राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# सेलमध्ये खरेदी केलेला नवा स्मार्टफोन असू शकतो बनावटी




ऑनलाइन ई-कॉमर्स वेबसाईट्स दरदिवशी नवनवीन सेलचे ऑफर आणत असतात. या सेलमध्ये काही बंपर ऑफर्ससुद्धा असतात ज्यात भरपूर प्रमाणार डिस्काउंटसुद्धा असते. त्यामुळे अनेक लोकांना ऑनलाईन शॉपिंग करायला आवडते.

स्मार्टफोनवरही बरेच ऑफर आणि सेल असतात. विशेष ऑफरच्या सेलमध्ये असलेले स्मार्टफोन्सही अनेकजण खरेदी करतात, पण कधी तुमच्या मनात हा विचार आला की, जो फोन तुम्ही सेलमध्ये खरेदी करीत आहात तो बनावटी असेल तर... जर तुमच्या मनात अशा प्रकारची शंका निर्माण झाली तर तुम्ही सोप्या पद्धतीने स्मार्टफोन बनावटी आहे की नाही, हे चेक करू शकता.


एसएमएस पाठवून करा चेक : डिपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशनने एक अशी सुविधा दिली आहे की, ज्याद्वारे तुम्ही एसएमएस पाठवून फोनविषयी डिटेल्स जाणून घेऊ शकता. याशिवाय तुम्ही सी-डॉट अ‍ॅपद्वारे तुमचा फोन बनावटी आहे की नाही, हेसुद्धा चेक करू शकता.

मॅसेजद्वारे जाणून घेण्यासाठी १४४२२ नंबरवर एक मॅसेज पाठवा. मॅसेज KYM² स्पेस तुमच्या फोनचा १५ अंकांचा आयएमईआय नंबर या मेसेजवर पाठवा. तुम्हाला फोनची सर्व डिटेल्स मिळून जाणार.

कसा जाणून घ्यायचा आयएमईआय नंबर : आयएमईआय नंबर जाणून घेणे, खूप सोपे आहे. तुम्हाला तुमच्या फोनमध्ये *०६ डायल करा. हे डायल केल्यानंतर तुमच्या फोनच्या स्क्रीनवर एक मॅसेज येणार ज्यामध्ये खचएख नंबर असेल.

याशिवाय एक असा अ‍ॅप ही आहे. ज्याद्वारे तुम्ही आपल्या फोनची डिटेल्स जाणून घेऊ शकता. KYM² - Know Your Mobile अ‍ॅप हा फ्रीमध्ये डाउनलोड करा. हा अ‍ॅप तुम्ही प्ले स्टोर किंवा गूगल प्ले स्टोरवरुनही डाउनलोड करू शकता. हे अ‍ॅप सी-डॉटने स्वत: तयार केला आहे.

# प्रसिद्ध लेखक, कथाकार व.पु. काळे



**निमित्त**

वसंत पुरुषोत्तम काळे हे मराठी भाषेतील लेखक होते. ते व.पु. काळे या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी ६०पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत. पार्टनर, वपुर्झा, ही वाट एकटीची आणि ठिकरी ही पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत. ते प्रसिद्ध कथाकथनकार होते. त्यांचे १,६००पेक्षा जास्त कथाकथनाचे कार्यक्रम झाले होते. ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून येणारे ते पहिले मराठी लेखक आहेत. त्यांनी भरपूर कथासंग्रह लिहले आहेत.

व.पु. काळे मुंबई महानगरपालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते. लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार, अशी ख्याती असलेल्या व.पु. काळे अर्थात वसंत पुरुषोत्तम काळे यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी झाला. आपण सारे अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणस, दोस्त, माझ्या माझ्यापाशी, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार, असे पत्रसंग्रह, ललीतप्रकार खुपच प्रसिद्ध आहेत तसेच तप्तपदी ठिकरी व वाट एकटीची यासारख्या कादंबरी गाजल्या तसेच महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा सन्मान पु.भा. भावे पुरस्कार फाय फाउंडेशनचा पुरस्कार आणि अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनात अध्यक्षपद बहाल केले गेले. आपल्या लिखाणातून जगण्याचे तत्त्वज्ञान सोप्या पण रंजक पद्धतीने सांगणारे थोर साहित्यिक म्हणजे वसंत पुरुषोत्तम काळे. 'वपु' या दोन अक्षरांनी महाराष्ट्राला परिचित असलेल्या व.पु. काळे यांचा वाचकविश्वात स्वतंत्र असा संप्रदाय आहे. 'वपुं'नी ६०पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केले. त्यातील पार्टनर, वपूर्झा, ही वाट एकटीची यांचे कथाकथन त्यांनी स्वतः केले. या कथाकथनाला प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली आणि ऑडिओ कॅसेटमधून घराघरात पोहचणारे 'वपु' पहिले लेखक ठरले. पेशाने आर्किटेक्ट असणारे 'वपु' इमारतींच्या आराखड्याचे रेखन करण्यापेक्षा लेखन करू लागले आणि मराठी साहित्याला एक थोर साहित्यिक लाभला.

'वपुं'चे लिखाण चौफेर होते. कथा, ललित, नाटक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र असे सर्व लेखन प्रकार त्यांनी हाताळले. लेखनातली विशेष बाब म्हणजे कथा संपताना कथेत अचानक येणारा ट्विस्ट. त्यांच्या कथा जिवंत माणसांच्या, नातेसंबंधांच्या, स्वैर वेड्या मनाचे विविध कंगोरे अधोरेखित करणाऱ्या असत. 'वपुं'ची कथा वाचताना डोळ्यासमोर कथेचे कथानक तरळते. कथा वाचून झाल्यावरही त्यातले एक एक प्रसंग स्लाइड शोप्रमाणे डोळ्यासमोरून सरकत राहतात. लेखकाला कथा आपली वाटावी असेच 'वपु' लिहीत असत.

'वपुं'च्या पार्टनर, झोपाळा, आपण सारे अर्जुन, ऐक सखे, चतुर्भुज, काही खरं काही खोटं अशा अनेक पुस्तकांवर, त्यांच्या कादंबऱ्या आणि कथांवर वाचकप्रियतेची मोहोर उमटली आहे. त्यांच्या सर्व लेखनाचे, कथाकथनाचे श्रेय त्यांनी त्यांच्या पुण्याच्या चिंचोरे गुरुजींना दिले होते. व.पु. काळेंना अमेरिकेत आयोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल केले गेले.

निधनाआधी दोन वर्षापासून 'वपु' एका विचित्र मनस्थितीमध्ये होते. त्यांना निराशा आली होती. २६ जून २००१ रोजी मुंबई येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे राहत्या घरात निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# आंबा पाण्यात भिजवून खाणे ठरेल फायदेशीर

उन्हाळ्यासोबत आता आंब्याचा सीझन सुरू झाला आहे. उन्हाळ्यात चवदार, स्वादिष्ट आंबा खाण्याची एक वेगळीच मजा असते. आंबा हे असे फळ आवडत नाही असे फार कमी जण असतील. आंब्याच्या चवीमुळे खाताना एक मनशांती मिळते. लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना आंबा खायला आवडतो, पण घरातील वृद्ध आजी, आई अनेकदा आंबा पिण्यात भिजवून मग खा असे सांगताना दिसतात, पण आंबा पाण्यात भिजवूनचं का खाल्याला जातो? यामागचे कारण जाणून घेणे महत्त्वाचे आहे.



लहानपणापासून आंबा खाण्यापूर्वी आई, वडील पाण्यात काहीवेळ भिजवत ठेवून मग आपल्याला खायला देताना पाहिल असेल, पण आंबा खाण्यापूर्वी भिजवण्यामागे केवळ रसायने, घाण आणि धूळ काढणे एवढाच उद्देश नसतो. तो धुवून न घेतल्यास त्याची गुणवत्ता आणि चवही खराब लागते.

**उष्णता कमी करण्यास मदत** : आंब्यामध्ये थर्मोजेनिक गुणधर्म असतात जे शरीराच्या कार्यावर परिणाम करतात. यात आंब्यात फार उष्णता असते आणि उन्हाळ्यातील उष्णतेत तुम्ही आंबे खाता तेव्हा तुमच्या शरीरातही उष्णता वाढते. ज्यामुळे पचनसंस्था आणि आतड्यांवर परिणाम होऊ शकतो, पण आंबे भिजवल्याने त्यातील उष्णता कमी होण्यास मदत होते, तसेच बद्धकोष्ठता, त्वचेच्या समस्या, डोकेदुखी आणि जुलाब यांसारख्या समस्याही बऱ्याच प्रमाणात कमी होतात. त्यामुळे आंबा अर्धा तास पाण्यात भिजवल्यास थर्मोजेनिक गुणधर्मही कमी होतात.

**विविध आजारांपासून संरक्षण** : कीटक, तण आणि विविध जंतूंपासून आंब्याच्या झाडाचे संरक्षण करण्यासाठी कीटकनाशके आणि रसायनांची फवारणी केली जाते, या रसायनांचा आपल्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. कारण कीटकनाशकांमुळे त्वचेची जळजळ, मळमळ, श्वसनमार्गात जळजळ, ॲलर्जी, कर्करोग आणि डोकेदुखी इत्यादी समस्या उद्भवू शकतात.

आंबा भिजवून ठेवल्याने त्याच्या देटावरील चिटकपणा निघून जातो. आंब्याच्या देठावर पांढऱ्या रंगाचा एक चिकट पदार्थ बाहेर येतो ज्यामध्ये फायटिक ॲसिड असते. यामुळे आंब्याची चव वेगळी लागते.

**आंबा पाण्यात नक्की किती वेळ भिजवायचा?**

आंबे पाण्यात साधारण १५ ते २० मिनिटे भिजवून खावे. यामुळे आंब्यातील उष्णता कमी होते. जर आंबा न भिजवताच खाल्ला तर पोटाचे विकार वाढू शकतात.

रायगडमध्ये पहिली निमशहरी पंतप्रधान आवास योजना

# पोलादपूरमध्ये ७५० घरांची निर्मिती

**महाड : प्रतिनिधी**

सर्वसामान्य कामगार, शेतकरी आणि कष्टकरी वर्गा करिता रायगड जिल्ह्यांतील पोलादपुर तालुक्यांमध्ये शासकीय सहभातून ७५० घरांचा स्वराज कॉम्ल्पेक्स हा प्रकल्प उभारण्यांत येत असुन या प्रकल्पाचे सुमारे ८० टक्के बांधकाम पुर्ण झाले आहे. लाभार्थाना पुढील १८ महिन्यांमध्ये घराचा ताबा देण्यांत येणार असल्याचा विश्वास स्वराज कॉम्ल्पेक्स प्रकल्पाचे व्यवस्थापक हनुमंत सावंत यांनी दिला आहे.




केंद्र शासनाचा पंतप्रधान आवास योजना यांच्या माध्यमांतुन पोलादपूर सारख्या ग्रामीण भागामध्ये प्रकल्प उभारण्यांत येत आहे. हा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम असुन राज्यांतील मध्यम आणि अल्प उत्पन्न असलेल्या नागरिकांकरीता किफायती दरांमध्ये निवाऱ्याची सोय करुन देणे हे याचे प्रमुख उद्दीष्ट आहे. पंतप्रधान आवास योजनेतून प्रामुख्याने शहरी भागांमध्ये घर प्रकल्प आहेत. परंतु ग्रामिण भागांतील अल्प उत्पन्न गटांत असलेल्या लाभार्थाना किफायती मध्ये निवार्याची सोय व्हावी या करीता रायगड जिल्ह्यांतील पोलादपुर तालुक्यांत पंतप्रधान आवास योजनेच्या सहकार्यातुन सुमारे ७५० घरांचा प्रकल्प सुरु करण्यांत आला आहे.

या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी हॉटेल विसावा येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यांत आले होते. या वेळी प्रकल्पाचे प्रतिनिधी हनुमंत सावंत, संदीप पालकर,शिवसेनेचे जिल्हा प्रवक्ते नितीन पावले, महाड तालुका शिवसेना प्रमुख रविंद्र (बंधू) तरडे, मंगेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. सदरचा प्रकल्प उभारण्यां करीता राज्याचे फलोत्पादन मंत्री भरतशेट गोगावले यांचे विषेश सहकार्य लाभले असुन सर्व सामान्यांचे घराचे स्वप्न पुर्ण होण्यासाठी हा प्रकल्प उभारण्यांत येत असल्याने मंत्री.गोगावले यांनी विशेष सहकार्य केले असल्याचे बंधू तरडे यांनी सांगितले.

म्हाडा आणि पंतप्रधान आवास योजनेच्या सहकार्यातुन उभारण्यांत येत असलेला हा प्रकल्प जिल्ह्यातील शहरी भागांतील पहिलाच प्रकल्प आहे. संपुर्ण देशांमध्ये गुजराथ, कर्नाटक, महाराष्ट्र राज्यांमध्ये वरील पध्दतीचे प्रकल्प सुरु करण्यांत आले आहेंत. या प्रकल्पाच्या माध्यमातुन किफायतीच्या किमती मध्ये मध्यम गट उत्पन्नातील नागरिकांना घरे उपलब्द करुन देण्यांत आली आहेंत.

पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ग्रामिण भागांतील लाभार्थाला घरकुल योजने करीता १ लाख ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यांत येते, मात्र या प्रकल्पातुन एकुण २ लाख ५० हजार रुपयांचे अनुदान शासना कडून देण्यांत येते. त्याच बरोबर या साठी स्टॅम्प ड्युटी केवळ एक हजार रुपये असेल अशी माहिती पालकर यांनी दिली. हा महत्वाकांक्षी पकल्प उभा करण्या करीता रेरा अंतर्गत नोदणी करण्यांत आली आहे.

# रायगड जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील -जिल्हाधिकारी जावळे

## क्षयरोगमुक्त ३७६ ग्रामपंचायतींचा सत्कार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्षयरोग मुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ही अतिशय उल्लेखनीय बाब असून रायगड जिल्हा १०० टक्के क्षयरोगमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



जिल्हा क्षयरोग केंद्र व जिल्हा आरोग्य यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात क्षयरोगमुक्त झालेल्या ३७६ ग्रामपंचायतींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांचे स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनीषा विखे, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.प्राची नेहूलकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शितल जोशी, नॅशनल लीड डी. एफ.वाय,डॉ.श्वेता अरोरा, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ.आकाश राठोड उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, रायगड जिल्हा टीबीमुक्त करायचा असेल तर वैयक्तिक स्वच्छतेलाही महत्व दिले पाहिजे. वैयक्तिक स्वच्छता राहिली तर कुटुंब स्वच्छ राहील आणि कुटुंब चांगले राहिले तर गाव चांगले राहील. गाव चांगले राहील तरच आपला जिल्हा चांगला राहील. स्वच्छतेमुळे क्षयरोगच नाही तर इतर आजारांनाही आळा घालू शकतो. एखादी योजना यशस्वी करायची असेल तर त्या कामांमध्ये सातत्य असले पाहिजे. त्या योजनेची आपल्याला उद्दिष्ट माहीत असणे आवश्यक आहे आणि उद्दिष्ट पूर्ततेसाठी आपण मेहनत घेतली पाहिजे तरच यश मिळेल. क्षयरोग मुक्त ग्रामपंचायतींनी हे सातत्य राखावे. क्षयरोग विषयीच्या प्रचार प्रसिद्धीसाठी सोशल मिडीयाचा वापर जास्तीत जास्त करावा अशा सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड म्हणाले की, क्षयरोग हा मायक्रोबॅक्टेरियम ट्यूबर्क्युलोसिस या जिवाणूमुळे होतो. रायगड जिल्ह्यातील लोकसंख्या ही स्थलांतरित असून येथे आदिवासी भाग सर्वात जास्त आहे. तरीही आपल्या जिल्ह्याचे काम खूप चांगले आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य यांनी प्रयत्न केल्याने ३७६ ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त झाल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सेस फंडातून क्षयरुग्णांनी तीन महिन्याचे औषधाचे किट देण्यात येत आहेत असेही बास्टेवाड यांनी सांगितले.

प्रयोगशाळा पर्यवेक्षक जितेंद्र आहिरराव म्हणाले की, जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी आश्वासक पावले उचलण्यात येत आहेत. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मागील काही दिवसात ५ लाख १७ हजार ८१४ जणांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अति जोखीम ग्रस्तभाग, वयोवृद्ध, धूम्रपान-मद्यप्राशन करणाऱ्या व्यक्ती, कुपोषित व्यक्ती व मागील पाच वर्षातील क्षयरोग बाधित रुग्ण, टीबी रुग्णाशी संपर्कातील व्यक्ती, मधुमेह बाधित व एच.आय.व्ही. बाधित व इतर जोखीमग्रस्त व्यक्तीच्या समावेश होता. २०१४ या वर्षात ४ हजार २१८ नवीन क्षयरुग्ण आरोग्य विभागाने शोधून काढलेले आहेत. जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतींपैकी ३७६ ग्रामपंचायतींमध्ये एकही क्षयरुग्ण नसल्याने या ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. शेवटी मान्यवरांनी टी बी हरेल देश जिंकेल अशी शपथ सर्वांना दिली. कार्यक्रमास सरपंच, ग्रामसेवक, आशा सेविका उपस्थित होत्या. आभार सतीश दंतराव यांनी मानले.

# दुपारी उन्हाचा तडाका, पहाटे वातावरणात गारवा

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वातावरणात मोठ्याप्रमाणावर उष्णता निर्माण होत असल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.मात्र दुपारी जरी उन्हाचे चटके बसत असले,तरी सुद्धा रात्री वातावरणात अचानक पणे बदल घडत असल्यामुळे पहाटे गारवा निर्माण होत असून धुके पडत असल्यांचे या अचानक बदलत्या ऋतू मध्ये अनेकांना डॉक्टर सल्ला घ्यावा लागत आहे.

दुपारी कडक उन्हाचे चटके, सायंकाळी गार , पहाटे धुके निर्माण होत,असल्यामुळे दोन्ही ऋतू जणू एकाच वेळी निर्माण झाल्यांचा भास प्रत्येकाला जाणवू लागले गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता जाणवत असल्यामुळे पदूषण, तापमानात वाढ व अन्य कारणांमुळे निसर्गाचे चक्र अनियमीत फिरु लागले आहेत.कोणता ऋतू कधी येईल कसा याचा अंदाज नाही.त्या प्रमाणेच रात्री हवेमध्ये थोडासा गारवा असला तरी दिवसा मात्र उन्हाच्या झळा बसत आहते.

सकाळी ९ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके जाणवू लागत आहे.यामुळे पत्र्याच्या घरात वास्तव्य करणार्या लोकांची परवड होत असल्यांची खंत नागरिक व्यक्त करीत आहे.

## शांतता मोहल्ला कमिटीची आज खालापूरमध्ये बैठक

**चौक : प्रतिनिधी**

आगामी काळात सण उत्सव अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने शांतता मोहल्ला कमिटीची बैठक खालापूर पोलीस ठाण्यात मंगळवारी २५ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे,असे खालापूर पोलीस ठाण्याच्या वतीने सांगितले आहे.

येणाऱ्या काळात गुढी पाडवा, रमजान, हनुमान जयंती,१ मे साजरा होणार आहे.त्या अनुषंगाने उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या अध्यक्षतेखाली खालापूर पोलीस ठाणे येथे दुपारी चार वाजता बैठक आयोजित केली आहे.

## ‘कर्जतमध्ये हम सब एक है परंपरा कायम अशीच राहील’

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात नेहमीच हिंदू मुस्लिम बांधव एकत्र राहिले असून कधी दूजाभाव केल्याच्या घटना घडल्या नाहीत. ’हम सब एक हैं’ ही परंपरा कायम अशीच राहणार आहे.

छत्रपतींच्या काळातही अठरा पगड जाती एकत्र होत्या म्हणूनच या देशात स्वराज्य येऊ शकले. सर्वच समाजाने आताही एकत्र राहण्याची गरज आहे. भारत हा एकमेव देश आहे जिथे सर्वच धर्म व जातीचे लोक एकत्र नांदत आहेत, असे प्रतिपादन रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी केले.

कर्जत शहरातील सुन्नी जामा मज्जिद येथे परिवर्तन विकास आघाडीच्या वतीने मुस्लिम बांधवांच्या रोझा निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी कर्जत मुस्लिम समाजाचे मौलाना हैदर, समिती अध्यक्ष सैदू शेख, हमीद खैराट, जलील नजे, सरफराज टिवाले, बिलाल आढाळ यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पंचायत समिती माजी सदस्य दीपक श्रीखंडे, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, माजी नगरसेवक उमेश गायकवाड,सोमनाथ ठोंबरे, आदी उपस्थित होते.

# खोपोलीतील कर वसुलीसाठी प्रशासनाची दमछाक

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील मालमत्ता धारकांसह कारखान्याची कर वसूली करिता मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरपालिका कर अधिकारी युवराज विरणक यांच्या नेत्वाखाली गेल्या अनेक दिवसांपासून जनजागृती मोहिम राबवूनसुद्धा कर वसूलीचे उदिष्ट पूर्ण गाठण्यासाठी कर विभाग पथकाची दमछाक होत असून मार्च महिण्याच्या शेवटच्या टप्प्यात पच्चावन ते साठ टक्के कर वसुली झाली आहे.




नगरपालिका कार्यक्षेत्रात ३२हजार ५००च्या आसपास मालमत्ता धारक असून एकूण अंदाजे २५कोटी करापोटी रक्कम पालिकेस येणे अपेक्षित आहे. त्यापैकी १५कोटी ७६ लाख वसूली झाली आहे. तर अंदाजे ९कोटी ७०लाख थकित रक्कमे पोटी येणे आहे नागरिकांना कर भरणे सुलभ व्हावे याकरिता र. वा. दिघे वाचनालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालय येथील न. पा. शिक्षण मंडळ कार्यालया शेजारी असे दोन कर भरणा केंद्र सुरू केली आहेत. जास्तीत जास्त मालमत्ता धारकांनी कर भरणा करून जप्ती सारखी कटू कारवाई होवू नये यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

शहरातील कारखान्याची करापोटी १२कोटी ७४लाख रूपये रक्कम येणेअसूनअंदाजे त्यापोटी २कोटी १५लाख रूपये वसूली जमा झाली आहे. तर अन्य दोन कारखान्याची २३लाख थकबाकी येणेआहे. तसेच इडीया स्टिल या कंपनीची थकबाकीची ९कोटी७०लाख रूपये रक्कम । अनेक वर्षापासून येणे असल्याने या कारखान्याचे मालमत्तेसह जागेवर बोजा चढविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांच्या कडे पाठवला असल्याची सूत्रांकडून देण्यात आली.

> **इडिया स्टिल या कारखान्याची कराची रक्कम गेल्या अनेक वर्षापासून थकित आहे. अंदाजे ९कोटी७० लाख रुपये येणे थकित असल्याने मालमत्तेसह जागेवर बोजा चढविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे पाठविला असून हा प्रस्ताव खालापूर तहसीलदार यांचेकडे आल्या नंतर नगरपालिकेच्या नावाने बोजा चढेल**
> **– युवराज विरणकर, खोपोली**
> नगरपालिका कर अधिकारी

## कर्जत रेल्वेस्थानकात गाड्यांच्या माहितीच्या घोषणांचा सावळागोंधळ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकात गाड्यांच्या माहितीच्या घोषणांचा व इंडिकेटर वर माहिती देण्याचा सावळा गोंधळ सुरू असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. या बाबतीत कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली असता रेल्वे प्रशासनाने ठेके दाराच्या अटी आणि शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांचे कर्तव्य बजावताना अधिक तत्परताने सतर्क राहण्याचा आणि अशा चुका न करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कर्जत रेल्वे स्थानकात दिनांक २३ फेब्रुवारी रोजी खोपोली लोकलची कर्जत रेल्वे स्थानकात अनाउन्समेंट न झाल्यामुळे तसेच इंडिकेटर वर न दर्शवल्यामुळे कर्जतहून खोपोलीला जाणाऱ्या प्रवाशांचे खूप हाल झाले कर्जत येथून संध्याकाळी ५ वाजून ११ मिनिटांची असलेली खोपोली लोकल ची कर्जत रेल्वे स्थानकावर घोषणा न झाल्यामुळे व इंडिकेटरवर सुद्धा त्या लोकल गाडीची माहिती न दर्शवील्यामुळे कर्जत हून खोपोलीला जाणाऱ्या प्रवाशांचे खूप हाल झाले .

# शेतकऱ्यांनी जनतेचे कौटुंबिक शेतकरी व्हावे –विनायक काशिद

**कर्जत : प्रतिनिधी**

रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या अति वापराने सर्वसामान्य जनतेला दुर्धर आजारांचा सामना करावा लागत असल्याने शेतकऱ्यांनी जनतेचे हित लक्षात घेऊन आरोग्यवर्धक कृषीमाल उत्पादित करून ’ कौटुंबिक डॉक्टर ’ च्या धर्तीवर ’ कौटुंबिक शेतकरी ’ व्हावे ,असे आवाहन महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य विनायक काशिद यांनी येथे केले.



प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथी गृह सभागृहात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी आयोजित ’ प्रशिक्षण व निविष्ठा वाटप ’ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन संचालक आणि भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे होते.व्यासपीठावर वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. पुष्पा पाटील उपस्थित होत्या.

काशिद पुढे म्हणाले की, कोरोनासारख्या विपदेत फक्त कृषिक्षेत्रानेच देशाला तारले,हे स्पष्ट झाले असून भविष्यातही शेतीला पर्याय असणार नाही.शेतकऱ्यांनी समूह शेती, शेतकरी उत्पादक संघ स्थापून व्यावसायिक शेतीद्वारे अर्थार्जन करणे गरजेचे आहे.’आत्मा ’ अंतर्गत शेतकऱ्यांच्या सहली कृषी विद्यापीठ,दापोली येथे आयोजित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी मान्य केल्याचे त्यांनी सांगितले डॉ.वाघमोडे यांनी शेतकरी कुटुंबाचे आर्थिक स्थैर्य टिकणे महत्त्वाचे असल्याचे सांगून भातानंतर फुलशेती, भाजीपाला लागवड, वेलवर्गीय पिके, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्य व्यवसाय यासारख्या कृषिपूरक व्यवसायांकडे वळणे कसे फायदेशीर आहे, हे सोदाहरण पटवून दिले.वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी सेंद्रिय शेती आणि रासायनिक शेती यात संतुलन साधून एकात्मिक शेती पद्धतीची गरज त्यांनी प्रतिपादित केली.

अनुसूचित जातीच्या २० आणि अनुसूचित जमातीच्या ३० शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते निविष्ठा वितरित करण्यात आल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. तांत्रिक सत्रात डॉ. बी. डी. वाघमोडे यांनी ’सुधारित भात वाण आणि त्याची उपयुक्तता ’ डॉ.एम.पी.गवई यांनी ’ भात बीजोत्पादन तंत्रज्ञान ’डॉ. डी. जी. जोंधळे यांनी ’ भात बीजोत्पादनासाठी खत व पाणी व्यवस्थापन ’ डॉ. पी. डी. पाटील यांनी ’ भात बीजोत्पादन प्रक्षेत्रावरील रोग व्यवस्थापन ’ डॉ.व्ही.पी. सावंत यांनी ’ भात बीजोत्पादन प्रक्षेत्रावरील कीड व्यवस्थापन ’, या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

**Hiring Audit Staff**
**Fresh/ Experienced Audit staff required for CA firm**
at Hiranandani fortune city , Apollo 206, sector A, Garden enclave, Bhokarpada , Panvel
**Contact: 8390407010**

# खालापूर प्रभारी मुख्याधिकारी वैभव गारवे यांची बदली

**खोपोली : प्रतिनिधी**

घरपट्टी घोटाळ्यामुळे गाजत असलेल्या नगरपंचायत खालापूर मधील भ्रष्ट कर्मचारी यांची कोणतीही गय केली जाणार नसल्याचे आश्वासन देणाऱ्या प्रभारी मुख्याधिकारी वैभव गारवे यांची बढती होऊन बदली झाल्याने चौकशीचे पुढे काय होणार असा प्रश्न खालापुरच्या नागरिकांना पडला आहे.




जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीतील दैनदिन घरपट्टी भरणा चलन व घरपट्टी पावती यांचे लेखापरीक्षणात ऑनलाइन पद्धतीने तयार करण्यात आलेल्या पावत्या संबंधित पावती रक्कम लेखापाल यांचेकडे जमा न करता, नगरपंचायती मधील कर्मचारी यांचे लॉग इन आयडी वापरून रद्द केल्याचे ऑडिट मध्ये उघडकीस आले होते. प्रभारी मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी संबंधित कर्मचारी यांना नोटीस बजावत कारवाई का करू नये असा खुलासा मागितला होता. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

ॲडव्होकेट राकेश गव्हाणकर यांनी माहिती अधिकारात घोटाळा जनतेसमोर उघडकीस आणला होता. याप्रकरणी जागरूक खालापूर नागरिक आणि भाजपा खालापूर यांनी आक्रमक पवित्रा घेत दोषींवर कारवाईची मागणी मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या कडे केली होती. गारवे यांनी देखील नागरिकांना आश्वस्त करत चौकशी सुरू असून दोषींवर नक्की कारवा येईल असे सांगितले होते.

> **सदराचा घोटाळा लेखापाल यांना ऑडिट मध्ये आढळून आला होता. यानंतर खालापूर नागरिक एकवटले असून कारवाई साठी सह्यांची मोहीम देखील सुरू आहे. मुख्याधिकारी यांच्या बदली नंतर देखील जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांच्या कडे घोटाळेबाजांवर कारवाई साठी पाठपुरावा सुरू राहील.**
> **–ॲडव्होकेट राकेश गव्हाणकर, खालापूर**

**कागदपत्रे हरविलेबाबत**

मी, नरेश शांताराम गायकर, रा. रुम नं. बी–२०२, साई शरण बिल्डींग, सेक्टर ८, प्लॉट नं. ११, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. जि. रायगड माझेकडून कामोठे परिसरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी कामोठे शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ३७३/२०२५, दिनांक २०/०३/२०२५ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**
नरेश शांताराम गायकर, यांच्या साई शरण बिल्डींग, सेक्टर ८, रुम नं. बी–२०२ चे शेअर सर्टीफिकेट नं. ३२१ ते ३३०

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ८०८२६३९५९७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिनांक : २४/०३/२०२५

**सही/–**
नरेश शांताराम गायकर



# रोबोट करणार गुडघे आणि नितंबावर शस्त्रक्रिया

**नवी मुंबई : बातमीदार**

मेडिकव्हर रुग्णालयात ७६ वर्षीय महिला रुग्णावर रोबोटच्या मदतीने गुडघा बदल शस्त्रक्रिया पार पडली. ही महिला गुडघ्याच्या संधीवाताने हैराण झाली होती. शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्यानंतर ७६ वर्षीय वृद्ध महिला कोणाचीही मदत न घेता स्वतःहून चालू लागली.

या महिलेवर शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टरांनी मिस्सो उच्च-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णांवर शस्त्रक्रिया करणा-या रोबोटची मदत घेतली. मिस्सो रोबोटिक प्रणालीच्या मदतीने रुग्णांवर आता अचूक शस्त्रक्रिया साधणे अजूनच सोप्पे झाले आहे. ही रोबोटिक प्रणाली गुडघे आणि नितंबाच्या दुखण्याने हैराण झालेल्या रुग्णांच्या जीवनात आशेचा नवा किरण घेऊन आली आहे. या रोबोटिक प्रणालीच्या मदतीने होणाऱ्या शस्त्रक्रियेमुळे रुग्णांच्या तब्येतीत लवकर सुधारणा दिसून येतात.

सध्याच्या काळात गुडघा आणि निंतब दुखण्याच्या समस्या केवळ वृद्धांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत. अनेकांना दैनंदिन आयुष्यात गुडघेदुखी आणि नितंबदुखीच्या असह्य वेदना जाणवत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. गुडघे आणि नितंबदुखीचा वाढता त्रास लक्षात घेत नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयाने आता रोबोटच्या मदतीने गुडघे आणि नितंब दुखणीवर वेदनाविरहित उपाय शोधला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आता नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयात रोबोट गुडघे आणि नितंब बदलांची शस्त्रक्रिया केली जाईल.

रोबोटच्या साहाय्याने वेदनाविरहित शस्त्रक्रिया करणे शक्य झाल्याने रुग्णांना फारसा त्रास जाणवार नाही. अचूक शस्त्रक्रियेचे आव्हान आता रोबोटच्या मदतीने शक्य झाल्याने रुग्ण लवकर बरा होतो, काही दिवसांतच चालायलाही लागतो, अशी माहिती डॉक्टरांनी दिली.

# जखमी जीवन पाटीलला न्याय देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

ज्याच्या हातावर व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात वार होवून तो जखमी झाला आहे त्याला ३७ टाके पडले आहेत असे असतानाही विरोधकांवर आवश्यक असणारे गुन्हे खांदेश्वर पोलिसांनी दाखल केले नसल्याचे आमचे मत असून या संदर्भात आम्ही शासन दरबारी न्याय मागणार असल्याचे प्रतिपादन अन्याय अत्याचार निर्मुलन समितीचे कोकण विभागीय अध्यक्ष संतोष चाळके, उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिती पनवेलचे सदस्य बी.पी. लांडगे व जखमी जीवन पाटील यांनी आज पनवेल येथील पिसपार्क हॉटेल येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

२१ मार्च २०२५ रोजी जीवन पाटील हा त्याच्या गाडीवरून नवीन पनवेल येथून येत असताना त्याला दुसऱ्या गाडीने खरचटले तसेच पुढे जावून रिक्षालासुद्धा ठोकले. याबाबत जीवन पाटील याने संबंधिताला विचारले असता त्याने अरेरावीची भाषा केली व माझ्या हॉटेलवर ये असे सांगितले. तेव्हा पुढे असलेल्या हॉटेलवर जीवन हा गेला असता तेथील हॉटेल कामगारांनी धारदार सुर्याने हल्ला केला. स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी त्याने हात पुढे केला असता त्याच्या दोन्ही हाताला मोठ्या प्रमाणात वार झाले. तातडीने



तो पॅनेसिया हॉस्पिटलला जावून दाखल झाला. त्यानंतर तो उपचार घेवून तो खांदेश्वर पोलीस ठाण्यात त्याची तक्रार द्यायला गेला असता तेथील पोलीस अधिकारी घागरे व साळुंखे यांनी त्याची तक्रार घेण्यास टाळाटाळ केली. तसेच त्यांनी गुन्ह्याचे गांभीर्य कमी करण्याचे प्रयत्न करून विरोधकांना मदत केली आहे. व जीवन पाटील यांनी सांगितलेली घटना व त्याप्रमाणे त्याच्यावर झालेला हल्ला व संबंधित आरोपींविरोधात तशा प्रकारची कलमे दाखल करणे आवश्यक असताना ती कलमे दाखल केली नाहीत.

या उलट जीवन पाटील याच्यावरच जास्ती कलमे दाखल करण्यात आल्याचे अन्याय अत्याचार निर्मुलन समितीचे कोकण विभागीय अध्यक्ष संतोष चाळके, उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिती पनवेलचे सदस्य बी.पी.लांडगे व जखमी जीवन पाटील यांचे म्हणणे आहे. तरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहसचिव विभाग, पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना याबाबत त्यांनी तातडीने मेलद्वारे तक्रार केली असून जखमी जीवन पाटील याला शासनाने न्याय द्यावा अशी त्यांनी मागणी केली आहे.

## डॉ. अमर द्विवेदी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

'महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन' तर्फे भव्य राष्ट्रीय परिसंवाद 'आयुर्बोध-२५' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात डॉ. डी. वाय पाटील रुग्णालयाचे उपप्राचार्य व डॉ. अमर द्विवेदी लिखित 'आयुर्वेद आणि मूलभूत फ्रॅक्चर मॅनेजमेंट' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. राकेश शर्मा डॉ. रामदास आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले.

# केएलई महाविद्यालयात कायदा महोत्सव

## न्यायाधीशांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केएलई सोसायटीच्या केएलई कॉलेज ऑफ लॉ कळंबोली येथे २२ मार्च रोजी राष्ट्रीय कायदा महोत्सवाचा समारोप समारंभासह झाला. या स्पर्धेत भारतभरातून ५० संघांनी भाग घेतला.

मूट कोर्ट स्पर्धा आणि क्लायंट काउंसेलिंग स्पर्धेच्या अंतिम फेऱ्या महाविद्यालयाच्या परिसरात झाल्या. मूट कोर्ट स्पर्धेच्या अंतिम फेरीचे परीक्षण पी.एस. दिनेश कुमार (अध्यक्ष, सिक्युरिटीज अपिलीयट ट्रायब्युनल; माजी मुख्य न्यायमूर्ती, कर्नाटक उच्च न्यायालय), मिलिंद जाधव (न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), आणि प्रा.डॉ.सोमू सी. एस. यांनी केले. समारोप समारंभ अरविंद कुमार (न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), पी. एस. दिनेश कुमार, मिलिंद जाधव आणि प्रा. सोमू सी. एस. यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रभाकर कोरे, अध्यक्ष, केएलई सोसायटी, बेळगाव होते. डॉ. प्रभाकर कोरे यांनी केएलई सोसायटीच्या समृद्ध परंपरेबद्दल आणि शिक्षण व कायद्याच्या अध्ययनातील योगदानाविषयी भाष्य केले. न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी ३ आय आणि ५ पी या संकल्पनांवर भर देत यशस्वी वकिलांसाठी आवश्यक कार्यनैतिकता विषयी मार्गदर्शन केले.




पी.एस. दिनेश कुमार यांनी कायदा व्यवसायात न्यायालयीन प्रक्रियेचे महत्त्व आणि सक्षम व समर्पित वकिलांची गरज अधोरेखित केली. न्यायमूर्ती अरविंद कुमार यांनी त्यांच्या वैयक्तिक प्रवासातील काही प्रेरणादायी अनुभव शेअर करत, परिश्रम, चिकाटी आणि समर्पण यामुळे कायदा व्यवसायात यशस्वी होता येते, हे स्पष्ट केले, तसेच प्रथम पिढीतील वकिलांसाठी प्रेरणादायी विचार मांडले.

मूट कोर्ट स्पर्धेत केईएस जयंतिलाल एच. पटेल लॉ कॉलेज यांनी विजेतपद आणि ३१ हजार रुपये आणि करंडक पटकावला. तर अलाईन्स युनिव्हर्सिटी, बेंगळुरू उपविजेता ठरला. त्यांना २१ हजार व करंडक प्रदान करण्यात आला. ख्रिस्त (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी), लवासा यांना सर्वोत्कृष्ट विधी विद्यार्थी पुरस्कार मिळाला, तर महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा यांनी सर्वोत्कृष्ट स्मृतीपत्र पुरस्कार जिंकला.

क्लायंट काउंसेलिंग स्पर्धेत दमोधरम संजीवैया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी यांनी विजेतेपद पटकावले आणि ११ हजार व करंडक जिंकला, तर आयआयएलएम युनिव्हर्सिटी, गुरुग्राम उपविजेता ठरला. आयआयएलएम युनिव्हर्सिटी, गुरुग्राम येथील विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट सल्लागार पुरस्कार देण्यात आला

# नूतन विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

एन.सी.आर. डी.संचलित, नूतन मराठी विद्यालयाचा इयत्ता दहावीचा शुभचिंतन/निरोप समारंभ गुरुवार २० मार्च रोजी संपन्न झाला.

यावेळी अशोक सोनवणे,कैलास निवृत्ती नागरे, प्रदीप कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी इ.१० वीच्या आदर्श विद्यार्थी म्हणून ओम कोळेकर व आदर्श विद्यार्थीनी तन्वी शिंदे यांना गौरविण्यात आले. बोर्डात अव्वल गुण प्राप्त केलेल्या आलेल्या रघुनाथ बदक, वेदिका संदीप गिरे ईश्वरी विश्वास पाटील यांना गौरविण्यात आले.



इ. आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य आणि फॅशन शो सादर केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सैद, मुंढे आणि औटी, सुतार आणि राजू लोंढे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाप्रसंगी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनिता नवले उपस्थित होत्या. सुजाता मुंढे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.१० वीच्या विद्यार्थिनी सिद्धी कदम व सलोनी लोंढे यांनी केले.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात पदवीदान समारंभ




**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ जी नाईक महाविद्यालय येथे दिनांक २२ मार्च रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात पारितोषिक वितरण व पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून समाजसेविका कल्पना नाईक तसेच कल्याणी नाईक शिवाय रा. फ. नाईक प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका राजश्री यादव , आणि पूर्व प्राथमिक विभागाच्या एलन फर्नांडिस तसेच एफ जी नाईक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रताप महाडीक , महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.दत्ता घोडके , विज्ञान (आयटी) विभाग प्रमुख प्रा. स्मृतिगंधा बिडकर तसेच स्टूडेंट कौन्सिलच्या प्रमुख प्रा. मोनिका पराड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य प्रताप महाडिक यांनी महाविद्यालय अनेक शैक्षणिक सामाजिक, क्रीडा सांस्कृतिक तसेच विद्यापीठाने सूचित केलेल्या अनेक कार्यक्रमात कोणत्या ना कोणत्या तरी विभाग जसे राष्ट्रीय सेवा योजना, महिला विकास कक्ष, डी एल एल ई, क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, नोकरी व्यवसाय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग इत्यादी विभागाच्या माध्यमातून सातत्याने सहभाग दर्शवित असून त्यासाठी श्रमिक शिक्षण मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन तसेच सहकार्य वेळोवेळी लाभत आहे याचा उल्लेख प्राचार्य प्रताप महाडिक यांनी केला.

प्रमुख अतिथी कल्पना नाईक यांनी श्रमिक शिक्षण मंडळ अंतर्गत शैक्षणिक, क्रीडा सामाजिक अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील कालखंडात विद्यार्थ्यांना कोणत्याही समस्या उद्भवल्या तरीही श्रमिक शिक्षण मंडळ सदैव विद्यार्थ्यांसाठी प्रयत्नशील असेल असे आश्वासन दिले. कल्याणी नाईक यांनी विद्यार्थी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व व आपल्या देशासाठी आणि समाजासाठी एक सुशिक्षित सुसंस्कृत नागरिक होण्यासाठी शिक्षण प्रत्येकाच्या आयुष्यात महत्त्वपूर्ण आहे हे विविध उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना पटवून दिले. सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी हस्तलिखित 'अक्षराकाश' याचे अनावरण कल्पना नाईक व कल्याणी नाईक यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

सदर प्रसंगी शैक्षणिक वर्ष २०२३ २४ च्या विद्यार्थ्यांचे पदवीदान करण्यात आले होते शिवाय शैक्षणिक,क्रीडा सांस्कृतिक सामाजिक ईतर क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे पारितोषिक, प्रमाणपत्रे, रोख रक्कम देऊन कौतुक करण्यात आले.


# आरटीईच्या विद्यार्थ्यांना फी भरावी लागणार

## शासनाकडून मिळाल्यावर पालकांना करणार परत

**नवी मुंबई: बातमीदार**

आर टी ई प्रवेशातील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे आणि शासनाकडून प्रतीपूर्ती झाल्यानंतर पालकांना परत देण्यात येईल असे निवेदन महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन(मेस्टा) ने नवी मुंबई महानगरपालिका येथील उपायुक्त (शिक्षण) संघरत्ना खिल्लारे व शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांना देण्यात आले आहे

शासनाच्या शिक्षण हक्क अधिकारात शाळांना २५ टक्के प्रवेश पालकांकडून फी न घेता करावे लागतात व त्या रकमेचा भरणा शासनाकडून शाळांना केला जातो, परंतु गेल्या पाच ते सहा वर्षांपासून शासनाकडून शाळांना या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची फी दिली गेली नसल्याने प्रत्येक शाळेचे लाखो रुपये शासनाकडे



बाकी आहेत. या थकबाकी मुळे शाळांचे व्यवस्थापन डबघाईस आले असून विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा पुरवणे , शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार, विज बिल, पाणी बिल, टॅक्स भरणे, शालेय इमारती देखभाल दुरुस्ती करणे व इतर सोयी सुविधा यांची पूर्तता करणे संस्थांना कठीण झाले आहे.

शिक्षण हक्क अधिकार कायद्यानुसार ज्या शैक्षणिक वर्षाच्या फी ची प्रतीपूर्ती त्याच वर्षी ३१ मार्च पूर्वी देणे असे नमूद असताना शासनाकडून २०१९ पासून या फी रकमेची प्रतीपूर्ती केलेली नाही. त्यामुळे मेस्टाने असे ठरविले आहे की, चालू सत्र २०२५-२६ पासून आर टी ई प्रवेशातील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे आणि शासनाकडून प्रतीपूर्ती झाल्यानंतर पालकांना परत देण्यात येईल.

आरटीई प्रवेशावेळी पालकांनी दिलेले बनावट दाखले व मुदतीनंतरचे पुरावे याबद्दल कठोर कारवाई करावी. असे निवेदन नवी मुंबई महानगरपालिका येथील उपायुक्त (शिक्षण) संघरत्ना खिल्लारे व शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांना देण्यात आले. मेस्टाचे ठाणे विभागीय अध्यक्ष नरेश पवार, यज्ञेश पवार, प्रभाकर डहाके, दिनेश मिसाळ, पांडुरंग मुळीक, विजय प्रजापती व गोरख कदम यांची उपस्थिती होती.

# नवी मुंबईतदेखील 'मीच तो नामदेव ढसाळ'

**नवी मुंबई : बातमीदार**

चल हल्ला बोल या चित्रपटातील पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितेवर आक्षेप घेत कोण नामदेव ढसाळ? असा अवमानकारक प्रश्न विचारून सेन्सॉर बोर्डाच्या एका अमराठी व उन्मत्त सदस्याने आपल्या अकलेचे तारे तोडले.

## लेखक, कवी, अभिनेते एकवटले




या प्रकरणी सेन्सॉर बोर्डाच्या विरोधात महाराष्ट्रभर संतापाची लाट निर्माण झाली. लेखक, कवी, पत्रकार, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध व्यक्ती व संस्थांकडून या वक्तव्याचा निषेध करण्यात आला.नवीमुंबईत ही याबाबत आवाज उठवण्यासाठी प्रयत्न झाला. नवी मुंबईतील, मधुकर वारभुवन, राम झेंडे, अभिमान जगताप, अश्वजित जगताप व इतरांनी एकत्र येवून सीवूड येथील लुंबिनी बुद्ध विहारात याच मान्यवरांचा काव्य वाचनाचा कार्यक्रम शनिवार दि. २२ मार्च रोजी आयोजित केला होता.

ज्येष्ठ लेखिका व कवयित्री डॉ. प्रज्ञा पवार, प्रसिद्ध सिने अभिनेत्री चिन्मयी सुमित, प्रसिद्ध लेखिका व कवयित्री नीरजा, जेष्ठ लेखक, कवी व शाहीर संभाजी भगत, प्रसिद्ध अभिनेता दिग्दर्शक हेमंत ढोमे, अभिनेता व गायक कैलास वाघमारे आणि या कार्यक्रमाचे मुख्यसूत्रधार व समन्वयक जेष्ठ पत्रकार युवराज मोहिते उपस्थित होते. संविधान उद्देशिकेच्या वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमास नमुंमपा शिक्षणाधिकारी अरूणा यादव, गझलकार अप्पा ठाकूर, कवी व पत्रकार दुर्गेश सोनार, पँथर सुमेध जाधव, पत्रकार निलेश झाल्टे, कवी जितेंद्र लाड ,ढसाळ परिवारातील डॉ.स्वप्नील ढसाळ आणि नवी मुंबईतील विविध क्षेत्रातील मान्यंवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर वारभुवन यांनी केले.

# ऐन उन्हाळ्यात काकडी पोहचली पन्नाशीपार!

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सध्या वाढत असलेल्या उष्णतेत शीतपेयाबरोबरच थंड भाज्या-फळे खाण्याकडे नागरिकांचा कल असल्याचे पहावयास मिळत आहे.त्यात बारमाही खाल्ली जाणारी काकडी सध्या बाजारात फारच भाव खात असून किरकोळ बाजारात काकडीने पन्नाशी पार केली आहे.

काकडी तिन्ही मौसमात सेवन केली जाते. मात्र, उन्हाळ्यात ती भलतीच भाव खात आहे. उन्हाळ्यात शरीरासाठी आवश्यक पाणी व पौष्टिक तत्त्वे काकडीत भरपूर असल्याने बाजारात तिला मोठी मागणी आहे. सध्या कडाक्याचा उन्हाळा सुरु आहे. उन्हाच्या झळा चांगल्याच शरीराला चटका देत असल्याने विविध प्रकारची शीतपेय पिणे तसेच गाजर, बिट, कलीगड, नारळ पाणी त्याचबरोबर थंड भाज्या-फळे खाण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे.

आपल्या शरीराला थंडावा देण्यात काकडी सर्वोत्तम असून ती पौष्टिक देखील आहे. शरीरातील डिहायड्रेशन रोखून शरीराचे कार्य सुरळीत ठेवण्यासह त्वचा निरोगी राहण्यासाठी काकडी उपयुक्त व गुणकारी मानली जाते. काकडीत सुमारे २५ टक्के पाणी असते. त्यामुळे उन्हाळ्यात काकडी खाल्ल्याने शरीरात पाण्याची कमतरता अजिबात भासत नाही. मात्र, ती कोवळी वा तयार झालेली असेल तर पाण्याची मात्रा तिच्यात जास्त असते. काकडी काहीशा सफेद सालीची, तर दुसरी हिरव्या सालीची बाजारात उपलब्ध आहे. थंडीत सुमारे २० रुपये



किलो असलेल्या काकडीचे दर आता किरकोळ बाजारात पन्नाशी पार गेले आहे. जस-जसा उन्हाळा वाढेल तसा तिचा भाव वाढतो. हिरवी काकडी व सफेद काकडीचा भाव ५० ते ५५ रुपये किलो दर किरकोळ बाजारात आहे. गरमी आणखी वाढल्यानंतर काकडीचा भाव सुमारे ६० रुपयांपर्यंत जाईल असे व्यापाऱ्यांनी सांगितले.

काकडीचा वापर प्रामुख्याने कोशिंबीरमध्ये केला जातो. हॉटेल असो वा आपले घर सलाड म्हणून काकडी आवर्जून खाल्ली जाते. त्यात पाण्याची मात्रा व फायबर जास्त असल्याने माणसांचे वजन नियंत्रणात राहण्यात मदत होते.बाजारातील बहुतांश काकडी रासायनिक फवारणी केलेली असते. त्यामुळे शक्यतो ऑरगॅनिक काकडीला प्राधान्य दिले तर ती गुणकारी ठरते. कीटकनाशक फवारणी केलेली काकडी खाण्याआधी काही मिनिटे मिठाच्या वा हळदीच्या पाण्यात भिजवून ठेवली तर सालावरील रसायने बऱ्यापैकी निघतात. काकडीची आवक राज्यातील जुन्नर, खेड, रोहे, माणगांव, पालघर आदि भागातून मोठया प्रमाणात मुंबई, ठाणे, नवी मुंबईमध्ये होते.

**काकडी वा कलिंगडमध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स हे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यात उपयुक्त असते. ही खाल्याने पचनक्रिया चांगली राहून बद्धकोष्ठतेपासून दिलासा मिळतो. यातून मुबलक पाण्यासह व्हिटॅमिन सी व के मिळत असल्याने आरोग्यास फलदायी असते.**

**-डॉ. प्रशांत जवादे,**
**मुख्य वैद्यकीय अधिकारी,**
**नवी मुंबई मनपा**

# दिव्यांगांना शिवरायांचे विनामूल्य दर्शन

## रायगड रोपवे प्रशासनाचे कौतुकास्पद पाऊल





**पाली : प्रतिनिधी**

स्वराज्यसूर्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य व पराक्रमाने पावन झालेल्या किल्ले रायगडावर जाऊन राजांचे दर्शन घेण्याची प्रत्येक शिवप्रेमी, भारतीयांची तळमळ व इच्छा असते. रायगड रोपवे प्रशासनाने अभिमानास्पद व कृतिशील उपक्रम राबविला. यामध्ये रोपवे व्यवस्थापक श्री. खातू यांच्या पुढाकाराने हजारो दिव्यांगांना रोपवेतून विनामूल्य दर्शन घडवले गेले. या वेळी त्यांच्या चेहर्‍यावर निखळनारा आनंद पाहण्यासारखा होता.

चार वर्षापूर्वी जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून रोपवे प्रशासनाने दिव्यागांना रोप वे प्रवास विनामूल्य करण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हापासून ही विनामूल्य सेवा रोपवे प्रशासनाने आजपर्यंत व यापुढेही दिव्यांगांसाठी चालू ठेवली जाणार आहे, अशी माहिती रोपवे व्यवस्थापक श्री. खातू यांनी दिली. गेल्या दोन दिवसांत आतापर्यंतच्या काळातील सर्वाधिक सुमारे ७०० ते ८०० दिव्यांगानी रोप वेने प्रवासाचा आनंद घेतला, अशी माहिती रोप वे प्रशासनाकडून देण्यात आली. रोप वेद्वारे दिलेल्या या सेवेबद्दल दिव्यांग बांधवांनी व्यवस्थापनाचे आभार मानले.

# मुरूड येथे शहीद दिनानिमित्त क्रांतिवीरांना विनम्र अभिवादन



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील जुनी पेठ येथील सामाजिक कार्यकर्ते मोहन गजानन करंदेकर यांच्या निवासस्थानी क्रांतीवीर भगतसिंग राजगुरु व सुखदेव यांच्या ९४व्या स्मृतीदिनी अभिवादन कार्यक्रम झाला.

उपस्थितांनी क्रांतीवीरांना पुष्प वाहून आदरांजली देत स्मरण केले. भारत देशाला पारतंत्र्यांतून मुक्त करण्यासाठी ज्या असंख्य नरवीरांनी बलिवेदीवर प्राण दिले. त्यामध्ये भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु हे स्वातंत्र्यसैनिक अग्रेसर होते. हे तिघेजण २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये इन्कलाब झिंदाबाद, भारतमाता की जय या घोषणा देत शहीद झाले. हा इतिहास अभ्यासक्रमाच्या पुस्तकांतून नवीन पिढीला ज्ञात व्हावा अशी मोहन करंदेकर यांची धारणा असून चित्र प्रदर्शनीद्वारे अशा शहिदांचे स्मरण व्हावे म्हणून ते गेली ४३ वर्ष या दिवशी पहाटेपासून पाण्याचा एक थेंब ही प्राशन न करता निर्जळी उपवास करतात.

या वर्षी देशभक्त मोहन करंदेकर यांच्या निवासस्थानी माजी नगरसेवक गिरीश साळी, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, मुरूड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, बाळकृष्ण कासार, राष्ट्रपती पदक विजेते, अजित कारभारी, नितीन अंबुर्ले, सुरेंद्र मकू, नाना चौलकर मुरुड तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष संजय करडे, भाई विरकुड, प्राध्यापक मेघराज जाधव, कोळी समाजाचे माजी अध्यक्ष यशवंत सवाई, स्वप्नील कवळे, ऋषी पोतदार, मानसी करंदेकर, राजेश गुप्ते तसेच शालेय विद्यार्थी यांनी भेट देऊन वीर हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली.

# खालापूर पोलिसांकडून महिलांचा गौरव



**चौक : प्रतिनिधी**


खालापूर तालुक्यातील विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल गोरठण आणि वावोशी पोलीस दूरक्षेत्र यांच्या वतीने स्त्रीत्वाचा गौरव सोहळा सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री मयुरी कापडणे यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी खालापूर तालुक्यातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले.

सविता गर्जे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीवर्धन, इशिका शेलार सामाजिक कार्यकर्त्या, भक्ती साठेलकर अपघातग्रस्त यांना मदत करणारी सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी, हर्षदा तांबोळी मिसेस टुरिझम ग्लोबल, सविता मनवर पोलीस उपनिरीक्षक, सुजाता चव्हाण पोलीस उपनिरीक्षक, प्रिया खोपकर उद्योजिका, ॲड. गीता म्हात्रे विधी क्षेत्र यांनी आपल्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महिला दिनाच्या निमित्ताने उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम व खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्माननित करण्यात आले.

अशा कार्यक्रमाने समाजात आणि विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना उर्जा मिळते आणि महिलांचा सन्मान वाढतो अशी प्रतिक्रिया उपस्थितांमधून व्यक्त झाली. कार्यक्रमाला रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शुभेच्छा दिल्या. पोलीस उपनिरीक्षक आलोक खिसमतराव, पोलीस कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# कोर्लई किल्ला पर्यटकांना खुणावतोय!

## पुरातत्व खात्याने सोयीसुविधा पुरवण्याची मागणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

पोर्तुगीजकालीन कोर्लई किल्ला पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरले आहे. मुरूड पर्यटनात पर्यटक कोर्लई किल्ला पाहण्यासाठी हमखास भेट देतो, परंतु पर्यटकांना खुणावणाऱ्या कोर्लई किल्ल्यात पर्यटकांना सोयीसुविधांचा अभाव आढळत असून पुरातत्व खात्याने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

मुरूड तालुका पर्यटकांसाठी खास आकर्षण असून मिनी गोवा म्हणून संबोधले जाते. निसर्गरम्य परिसर, सुंदर स्वच्छ समुद्र किनारा तसेच लगतच फणसाड अभयारण्य यामुळे पर्यटक मुरूड तालुका पर्यटनासाठी भेटी देतात तसेच साळाव या मुरूडच्या प्रवेशव्दारानजीक दोन किमी अंतरावर असलेला पोर्तुगीजकालीन कोर्लई किल्लासुध्दा पर्यटकांचे आकर्षण आहे. तीन बाजूस समुद्र असलेल्या व चौफेर नजर ठेवण्यास उपयुक्त असा हा ऐतिहासिक किल्ला पहाण्यास नित्याने असंख्य पर्यटक येथे येत असतात, मात्र येथे सोयीसुविधांची वानवा आहे.

कोर्लई किल्लात प्रारंभी जाण्यासाठी मार्गफलकाचा अभाव असल्याने पर्यटकांना रस्ता किल्लात जाण्याकडे रस्ता शोधवा लागतो. किल्ल्यानजीक जाताना गाईड उपलब्ध नसल्याने किल्लात कोठून प्रवेश करावा, हा प्रश्न पर्यटकांना निर्माण होतो. किल्ल्यात जाण्यासाठी एक दोन मार्ग उपलब्ध आहेत. एक मार्गाने पायऱ्यांचा मार्गसुध्दा नादुस्त असल्याने अवघड बनला आहे, तर दुसरा बाजूकडून जाताना झाडीझूडूपातून रस्ता शोधत पर्यटक व किल्लाप्रेमी मंडळींना मार्गक्रमण करावे लागते.

किल्ल्याच्या मार्गक्रमणातील अडचणी दूर करत किल्ल्यात प्रवेश केल्यावर जिकडे तिकडे अवास्तव वाढलेले गवत तसेच रानटी झाडेझुडपे त्रासदायक ठरतात. पर्यटकांना किल्ल्यात फिरताना यामुळे समस्या निर्माण होते. चार वर्षापासून किल्ल्याचा बुरूज ढासळला असून अद्याप त्याचे संवर्धन करण्यात आलेले नाही. किल्ल्यावर साफसफाईकरिता एकच कर्मचारीवर्ग असल्याने तेथे घाणीचे साम्राज्य वाढले असून पाण्याची कमतरता जाणवते. किल्ल्यावर पर्यटकांसाठी मुलभूत सुविधाची उपलब्धता नसल्याने येथे येणारा पर्यटक निरूत्साही होतो.

किल्ल्यांवरील गैरसोयींसंदर्भात कोर्लई ग्रामपंचायत यांनी पुरातत्व खात्यास निवेदन दिले असून साफसफाईकरिता कर्मचारीवर्ग वाढविणे, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, किल्ल्याकडे जा-ये करण्यासाठी असलेल्या रस्त्याची, पायऱ्यांची दुरूस्ती तसेच मार्गफलक लावणे आदीबाबत मागणी यामध्ये केली आहे.

# मुरूडमधील योगेश दवटे यांच्या गझलसंग्रहाचे प्रकाशन



**मुरूड : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा मुरूडच्या वतीने येथील युवा गझलकार योगेश दवटे यांच्या राधिका या गझलसंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध गझलगायक गझलनवाज भिमराव पांचाळे यांचे हस्ते मुरुड नगरपरिषद शाळा क्र.४ येथे झाले.

अध्यक्षस्थानी कोमसाप रायगड जिल्हा अध्यक्ष सुधीर शेठ, तर विशेष अतिथी म्हणून जिल्हा समन्वयक अ.वि.जंगम, मुरुड-श्रीवर्धन नगर परिषदेच्या प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, कोमसाप रोहा शाखा अध्यक्षा संध्या दिवकर, ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ. रवींद्र नामजोशी, कवी, निवेदक सुबोध साने, मुरुड शाखा अध्यक्ष संजय गुंजाळ, रायगड जिल्हा युवाशक्तीप्रमुख सिध्देश लखमदे, योगेशचे आई-वडील उपस्थित होते.

प्रास्ताविक मुरुड शाखा अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी केले. या गझलसंग्रहाचे प्रकाशन राज्ञा दवटे हिने राधिकेच्या वेशभूषेत एका मडक्यातून गझलसंग्रहाच्या प्रती आणून अनोख्या पध्दतीने करण्यात आले.


प्रमुख पाहुणे गझलनवाज भिमराव पांचाळे यांनी गझल कशी सूचते, गझलेला संगीत देण्याची प्रक्रिया कशी घडते हे स्पष्ट करुन योगेशच्या गझलसंग्रहाचे कौतूक केले तसेच त्याची एक गझल सुरमयी स्वरात सादर करुन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

भिमरावांची सुकन्या बागेश्री पांचाळे हिनेही सुंदर गझलांचे गायन करून कार्यक्रम सांगितिक उंचीवर नेला. प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर यांनी राधिका या गझलसंग्रहाचे रसग्रहण केले. कार्यक्रम अध्यक्ष सुधीर शेठ, योगेश दवटे, सुबोध साने, प्रसाद चौलकर यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे ओघवते सुत्रसंचालन कोमसाप शाखा तळा अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी केले. या वेळी रसिकश्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नागोठणे : श्री अष्टविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष, माजी सरपंच तथा राष्ट्रवादीचे पेण विधानसभा मतदारसंघ उपाध्यक्ष विलास चौलकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाई टके, माजी सरपंच मधुकर चौलकर, ज्येष्ठ पत्रकार शामकांत नेरपगार, बिपीन सोष्टे. सोबत अष्टविनायक पतसंस्थेच्या संचालिका श्वेता चौलकर**

# रणरणत्या उन्हात थंडगार रानमेव्याची भुरळ



**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

उन्हाळ्याचे आगमन होताच हा रानातील रानमेवा बाजारात आल्याने यामध्ये करवंदे, कैरी, अंजीर, काजू, चिंच आदी जंगलामध्ये तयार झालेला रानमेवा मोहोपाडा, खोपोली, चौक या बाजारात दाखल झाले आहे. या रानमेव्यामुळे आदिवासी या समाज्याला रोजगार मिळत असतो तसेच रानातील काळी मैना अजून तयार झाली नसून हिरवी गार करवंदे म्हणून हिचा ठेचा म्हणून स्वयंपाक करण्यासाठी दैनंदिन जीवनात वापरत उपयोग होत आल्याचे महिला वर्गा कडून सांगण्यात येत आहे.

रुचकर, स्वस्त आणि औषधी असे बहुउपयोगी असलेल्या या रानमेव्याची अनेकांनी भुरळ पडत आहे. दुर्गम भागात राहणारे अदिवासीं बांधवांचे उत्पन्नाचे साधन म्हणून डोंगरातील रानमेवा असून उन्हाळ्याच्या दिवसामध्ये पटकन तोंडात टाकता येणारा तसेच शरीराला आणि मनाला गारवा देणार्या या रानमेव्याला अधिक मागणी दिसत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसामध्ये शरीराला थंडावा निर्माण होण्यासाठी फलाहार केला जातो. बाजारपेठेमध्ये आंबा, द्राक्षे, फणस, चिक्कू यासारख्या फळांचा बरोबरच करवंद, काजुफळ, तोरणे, यासारख्या रानमेव्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. असह्य करणार्या उन्हामध्ये अगदी पटकन तोंडात टाकता येणार्या आणि खायला रुचकर असणार्या या रानमेव्यांना सर्वांचीच मागणी असते.

शरीराला थंडावा देणारा आणि औषधी गुणधर्म असणारा रानमेवा अगदी आवडीने खाताना दिसतात. रानमेव्यामुळे डोंगर कपारीत राहणाऱ्या आदिवासी बांधवांना मात्र रोजगाराची यामुळे संधी उपलब्ध होत असते.

# आगरदांडा परिसरातील रिक्त आरोग्यसेवक पदे तातडीने भरावीत

## नागरिकांची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवक तसेच आरोग्य सहाय्यिका (एलएचव्ही) ही दोन पदे रिक्त असून या केंद्रांतर्गत येणाऱ्या पाच उपकेंद्रात आरोग्यसेवक हे प्रत्येकी एक पद रिक्त आहे. त्यामुळे ग्रामीण रुग्णांची गैरसोय होत आहे. ते लक्षात घेता रुग्णांना दिलासा मिळण्यासाठी उपरोक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

आगरदांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या राजपुरी, सावली, शिघ्रे, खार आंबोली व महालोर या उपकेंद्रात अनुक्रमे आरोग्यसेवकांची पदे रिक्त आहेत. रिक्त आरोग्यसेवकांची पदे न भरल्याने ग्रामीण व डोंगरी भागात राहणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. ती टाळण्यासाठी ही पदे भरण्यात यावीत अशी मागणी होत आहे.

या संदर्भात मुरूड तालुका आरोग्य अधिकारी पायल राठोड यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, रिक्त पदे भरण्यासाठी आरोग्य संचालनालयाच्या वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार केला असून मंजुरी मिळताच जागा भरू.

# माणगावमध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन



**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. संजय माळी आणि आयुर्वेदिक कन्सल्टिंग सायकोलॉजी डॉ. वर्षा माळी यांनी माणगावमध्ये ऑर्थोपेडिक आणि मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल उभारले आहे. या हॉस्पिटलचे उद्घाटन रविवारी (दि.२३) कोकण आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन करून डॉ. संजय माळी व डॉ. वर्षा माळी यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी प्रशाली दिघावकर, प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप, पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, दिलीप माळी, डॉ. आरती सूर्यवंशी, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, राजिपचे माजी सभापती ज्ञानदेव पवार, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, मुख्याधिकारी संतोष माळी, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, सभापती नंदिनी बामगुडे आदी उपस्थित होते.

# 'एक संध्याकाळ महिलांसाठी' उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.४मधील वाकडाईनगर महिला मंडळ आणि नगरसेविका ममता थोरे ग्रामीण विकास व रोजगार प्रशिक्षण संस्था यांच्या सौजन्याने जागतिक महिला दिन तसेच सावित्रीबाई फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त शुक्रवार एक संध्याकाळ महिलांसाठी... कार्यक्रम उत्साहात झाला. यामध्ये विविध गमतीशीर कार्यक्रमाचा महिलांनी मनमुराद आनंद लुटून नगरसेविका थोरे यांना विशेष धन्यवाद दिले.

वॉर्डाचा सर्वांगीण सुंदर विकास झाला पाहिजे हा उद्देश नजरेसमोर ठेवून वॉर्डातील विकासकामांबरोबरच वॉर्डातील ग्रामस्थांसाठी विविध उपक्रम राबविण्यावर नगरसेविका ममता थोरे यांचा नेहमीच भर राहिला आहे. अशाच एक उपक्रमापैकी सलग तिसऱ्या वर्षी थोरे यांनी आपल्या संकल्पनेतून सुरू केलेल्या वॉर्ड क्रमांक ४मध्ये वाकडाईनगर येथे एक संध्याकाळ महिलांसाठी कार्यक्रम आयोजित केला होता.

या वेळी महिलांकरिता विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्यांसाठी आणि सर्व उपस्थितांसाठी भेटवस्तूचे वाटप करण्यात आले. सर्व महिला मंडळांच्या सहकार्याने व उपस्थितीत सलग तिसऱ्या वर्षी हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यात आला. याबद्दल नगरसेविका थोरे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.



# चेपॉकवर चेन्नईची मुंबईवर सरशी

**चेन्नई : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सने नेहमीप्रमाणे आयपीएलमधील पहिला सामना गमावला आहे. चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सचा चार विकेट्सने पराभव करत आपले खाते उघडले आहे. मुंबईने १५५ धावाच केल्या असल्या तरी त्यांनी चेन्नईला सहज विजय मिळवू दिला नाही. मुंबईने अखेरच्या षटकापर्यंत चेन्नईला विजयासाठी वाट पहायला लावली, पण चेपॉकचा अभेद्य किल्ला मुंबईचा संघ भेदू शकला नाही.





चेन्नई सुपर किंग्सला अखेरच्या षटकात विजयासाठी सहा चेंडूत चार धावांची गरज असताना रचिनने पहिल्याच चेंडूवर षटकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. मुंबई इंडियन्स संघाने सततच्या विकेट्स गमावल्याने मोठी धावसंख्या उभारू शकले नाही, पण मुंबईच्या संघाने अखेरपर्यंत हार मानली नाही आणि सीएसकेला विजयासाठी मोठे कष्ट घ्यावे लागले. मुंबईकडून या सामन्यात पदार्पणवीर युवा खेळाडू विघ्नेश पुथूर याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

मुंबई इंडियन्सने दिलेल्या १५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरूवातही चांगली झाली नाही. राहुल त्रिपाठी दुसऱ्या षटकातच बाद झालाय, पण यानंतर ऋतुराज गायकवाडने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वात जलद अर्धशतक झळकावत मुंबईवर दबाव आणला. ऋतुराजने २६ चेंडूत सहा चौकार आणि तीन षटकारांसह ५३ धावा करत बाद झाला, पण त्याच्या खेळीसह त्याने मुंबईला बॅकफूटवर टाकले. यानंतर सर्व फलंदाज एका टोकावरून विकेट गमावत होते, पण रचिन रवींद्रने दुसऱ्या टोकाकडून सीएसकेचा डाव सांभाळत होता. रचिनने ४५ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांसह ६५ धावांची नाबाद खेळी केली, तर जडेजा १७ धावा करत बाद झाला.

तत्पूर्वी मुंबई इंडियन्स संघ नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीसाठी उतरला. मुंबईची सुरुवात खूपच खराब झाली, रोहित शर्मा तीन चेंडू खेळून शुन्यावर बाद झाला. यानंतर रायन रिकल्टन १३ धावा, विल जॅक्स ११ धावा करत बाद झाले. सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माने संघाचा डाव सावरला. त्यांनी अर्धशतकी भागीदारी करत मुंबई इंडियन्सला १०० धावांपर्यंत नेले. दिपक चहरने १५ चेंडूत दोन चौकार आणि दोन षटकारांसह २८ धावा केल्या. यासह मुंबई इंडियन्सने ९ बाद १५५ धावा केल्या. सीएसकेकडून नूर अहमदने चार विकेट्स घेत सामना फिरवला, तर खलील अहमदने मुंबईला सुरुवातीचे धक्के दिले आणि तीन विकेट्स नावे केल्या.

## विघ्नेश पुथूरने वेधले लक्ष

*मुंबई इंडियन्सचा युवा गोलंदाज विघ्नेश पुथूरने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. इम्पॅक्ट खेळाडूच्या रूपात संधी मिळालेल्या विघ्नेशने त्याच्या आयपीएल पदार्पणात तीन विकेट्स घेतल्या. त्याच्यामुळे सीएसकेचा विजय थोडा कठिण झाला होता. विघ्नेशने या सामन्यात ऋतुराज गायकवाड, शिवम दुबे आणि दीपक हुडा अशा मोठ्या आणि तीन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. विघ्नेश हा मूळचा केरळचा असून रिक्षाचालकाचा मुलगा आहे. स्थानिक क्रिकेटमधील एका संघात खेळताना मुंबई इंडियन्सच्या शोध पथकानं या हिऱ्याला हेरले. चेन्नईच्या विजयानंतर महेंद्रसिंह धोनीने जाऊन विघ्नेशची भेट घेतली व त्याचे कौतुक केले.*

राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# कोल्हापूर, मुंबई उपनगर विजेते



**ठाणे : प्रतिनिधी**

कोल्हापूरने पुरुषांत, तर मुंबई उपनगर पश्चिमने महिलांमध्ये ७२व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनने विश्वास सामाजिक संस्था व शारदा संकल्प प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले होते.

ठाणे पश्चिम येथील कॅडबरी कंपनीजवळील भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी क्रीडांगणार झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात कोल्हापूरने अहिल्यानगरचा ४२-३२ असा पराभव करीत दोन तपाच्या कालावधीनंतर श्रीकृष्ण करंडक फिरत्या चषकाबरोबर मुख्यमंत्री चषकावर आपले नाव कोरले. कोल्हापूर शिरोळ येथे २००३ साली झालेल्या स्पर्धेत त्यांनी पुण्याला पराभूत करीत पहिल्यांदा जेतेपदाला गवसणी घातली. पुणे येथे २००४ साली झालेल्या व कराड, सातारा येथे २०१७-१८ साली झालेल्या स्पर्धेत ते उपविजेते ठरले होते.

उपविजेत्या अहिल्यानगर संघाने सलग चौथ्यांदा अंतिम फेरीत धडक दिली, पण फेब्रुवारी २०२२ साली काल्हेर, भिवंडी, ठाणे येथे झालेल्या स्पर्धेत ते विजेते ठरले होते. नंतर सलग तीन वर्ष त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागत आहे. कोल्हापूरने सावध सुरुवात करीत नगरवर पहिला लोण देत विश्रांतीला १८-१३ अशी आघाडी घेतली. कोल्हापूरने विश्रांतीनंतर आपला खेळ अधिक गतिमान केला. त्यांच्या सौरभ फागरे याने एकाच चढाईत तीन गडी टिपत व शिलकी गड्याची पकड करीत दुसरा लोण देत २६-१६ अशी आपली आघाडी वाढविली. पुन्हा त्यांच्या साहिल पाटीलने एकाच चढाईत चार गडी टिपत तिसरा लोण देत आपली आघाडी ३८-२४ अशी भक्कम केली. शेवटची पाच मिनिटे पुकारली तेव्हा ४०-२७ अशी कोल्हापूरकडे आघाडी होती. शेवटी १० गुणांच्या फरकाने



कोल्हापूरने आपल्या दुसऱ्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. कोल्हापूरच्या विजयात सौरभ व साहिलला चढाईत ओंकार पाटील, तर पकडीत दादासो पुजारी व अविनाश चारपलेची भक्कम साथ लाभली.

महिलांच्या अंतिम सामन्यात मुंबई उपनगर पश्चिमने ५-५ चढायांत मुंबई शहर पश्चिमचा प्रतिकार ३३-३२(६-५) असा मोडून काढत पार्वतीबाई सांडव फिरता चषक व मुख्यमंत्री चषक आपल्याकडे खेचून आणला. सातारा कराडयेथे २०१७-१८ साली झालेल्या स्पर्धेत उपनगरने जेतेपद मिळविले होते. त्यानंतर त्यांना हे यश मिळाले. उपनगरेचे या स्पर्धेतील हे तिसरे जेतेपद. सामन्याच्या पहिल्या चढाईपासून चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात १२-११ अशी उपनगरकडे आघाडी होती. उत्तरार्धात उपनगरने शेवटच्या काही मिनिटात सोनालीची पकड करीत मुंबईवर लोण देत आघाडी घेतली. सोनालीची ही पकड चढाईची कालमर्यादा संपल्याने यशस्वी झाली. पूर्ण डावात झालेला हा एकमेव लोण. शेवटी हा सामना २७-२७ असा बरोबरीत संपला.

सामन्याच्या निकालाकरिता दोन्ही संघांना प्रत्येकी ५-५ चढाया देण्यात आल्या. त्यात उपनगरने चढाईत पाच गुण व पूजा यादवची पकड करीत सहा गुण घेत बाजी मारली. पूजाची पकड मुंबई शहराला पराभवाच्या खाईत घेऊन गेली. उपनगराच्या या विजयाचे श्रेय कोमल देवकर, प्रतीक्षा पन्हाळकर यांच्या संयमी चढाया, तर प्रणाली नागदेवता, करीना पाटील यांच्या भक्कम बचावाला जाते.

# खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत दिलीप गावितची 'सुवर्ण'धाव!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये ॲथलेटिक्स प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंची दमदार कामगिरी सुरूच आहे. नाशिकच्या दिलीप गावित याने पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-४७ या प्रकारातून सुवर्णपदक पटकावले. कोल्हापूरचा साईवर्धन पाटील, कराडचा साहिल सय्यद, चैतन्य पाठक हे रूपेरी यशाचे मानकरी ठरले.

जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर स्पर्धेतील ॲथलेटिक्सचा थरार सुरू आहेत. नाशिक जिल्ह्याच खेळाडू असलेल्या दिलीपने ४८.७६ सेकंद वेळेत शर्यत जिंकली. हरयाणाच्या जसबीरने (४९.८८ सेकंद) रौप्य, तर गुजरातच्या भाविककुमारने (५१.०८) कांस्यपदक प्राप्त केले.

पुरुषांच्या एफ ३७ लांब उडी प्रकारात

## साईवर्धन, साहिल, चैतन्यला रौप्यपदक



कोल्हापूरच्या साईवर्धन पाटीलला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अवघ्या ३४ सेंटीमीटरने त्याचे सुवर्णपदक हुकले. साईवर्धनने ११.५९ मीटर लांब उडी मारली. साईवर्धन हा पॅरालिम्पिकमधील पदकविजेता सचिन खिलारी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. खेलो इंडिया स्पर्धेतील त्याचे हे पहिलेच पदक ठरले.

कराडच्या साहिल सय्यद याने पुरुषांच्या गोळाफेकमध्ये ७.८२ मीटरचा टप्पा गाठत रौप्यपदकाचा मान पटकावला. यात तमिळनाडूच्या इम्रान रसूलने (२९.२०) सुवर्णपदक जिंकले. पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-१३ प्रकारात चैतन्य पाठक याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याने ५४.९९ सेकंदात हे अंतर पार केले. ५४.४१ सेकंद वेळ देणारा हरयाणाचा सुबोध भट सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत टी -५३,५४ प्रकारात गीता चौहान हिने कांस्यपदक प्राप्त केले. तिने २८.५१ सेकंदात शर्यत पूर्ण केली.


## चेन्नई-मुंबई सामन्यात बॉल टॅम्परिंग?


**चेन्नई : वृत्तसंस्था**


चेन्नई सुपर किंग्जने आयपीएलमध्ये मोहिमेची सुरुवात मुंबई इंडियन्स संघावरील विजयाने केली. दरम्यान, सोशल मीडियावरील चाहते सीएसकेवर बॉल टॅम्परिंगचा आरोप करत आहेत.

व्हायरल व्हिडीओमध्ये सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याने वेगवान गोलंदाज खलील अहमदकडे चेंडू देताच खलील त्याच्या खिशातून काहीतरी काढून कर्णधार ऋतुराजला देताना दिसतो. यावर अनेकजण बॉल टॅम्परिंगचा आरोप करीत आहे.

# रायगडच्या इरा, प्रकाश, प्रणित यांची महाराष्ट्र राज्य सॉफ्ट टेनिस संघात निवड







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सॉफ्ट टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया व पंजाब सॉफ्ट टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १८वी सब ज्युनिअर गट राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा २७ ते ३१ मार्चदरम्यान पंजाबमधील लुधियाना येथे होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र संघ सहभागी होणार असून संघात रायगड जिल्ह्याचे खेळाडू प्रतिनिधित्व करणार आहेत.

राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशन खेळाडू इरा आयथनं (विश्वज्योत हायस्कूल खारघर), प्रकाश गौतम (महात्मा इंटरनॅशनल स्कूल खांदा कॉलनी) आणि प्रणित दोडे (सेंट मेरीज मल्टीपर्पज हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज वाशी) यांची मुंबई माटुंगा येथे झालेल्या सब ज्युनिअर निवड चाचणीमधून महाराष्ट्र संघात निवड झाली आहे, तर रायगड जिल्ह्याचे सचिव स्वप्नील वारंगे यांची महाराष्ट्र संघांचे प्रशिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशचे सचिव नामदेव शिरगावकर महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस असोसिएशनचे सचिव रवींद्र सोनवणे, जिल्हा क्रिडा अधिकारी, रायगड सॉफ्ट टेनिस स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव स्वप्नील वारंगे, माणगाव जिल्ह्याचे क्रिडा मार्गदर्शक संजय गमरे आदींनी खेळाडूंचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# शतकानंतरच्या इशान किशनच्या सेलिब्रेशनची चर्चा

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादच्या संघाने घरच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या लढतीत राजस्थान रॉयल्सच्या संघाला मात देत यंदाच्या हंगामाची दमदार सुरुवात केलीये. सनरायझर्सकडून पदार्पण करताना इशान किशन याने शतकी खेळीसह या सामन्यात खास छाप सोडली. तो ४७ चेंडूत १०६ धावांवर नाबाद राहिला. आयपीएल कारकिर्दीतील पहिल्या शतकी खेळीनंतर त्याने खास अंदाजात सेलिब्रेशन केल्याचे पहायला मिळाले.

मैदानातील क्लास खेळीदरम्यान अर्धशतक झळकावल्यावर त्याने 'फ्लाइंग किस'सह खास सेलिब्रेशन केले. ही गोष्टही सध्या चर्चेचा ठरतीये. त्याचा हा 'फ्लाइंग किस' कुणासाठी होता, असा प्रश्न अनेकांना पडलाय. एवढेच नाही काहींनी या संदर्भातील अंदाज बाधून त्याचं उत्तरही देण्याचा प्रयत्न केला आहे.

सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यातील सामन्यावेळी आपल्या ऑरेंज आर्मीला सपोर्ट करण्यासाठी एसआरएचची मालकीण काव्या मारनही स्टँडमध्ये स्पॉट झाली. आपल्या ताफ्यातील तुफान फटकेबाजी करणाऱ्या फलंदाजांना ती स्टँडमध्ये टाळ्या वाजवत दाद देताना दिसून आले. ट्रॅविस हेडच्या फटकेबाजीशिवाय इशान किशनच्या बॅटिंग बघताना



काव्याचा आनंद अगदी गगनाला भिडला होता. हाच दाखला देत इशान किशन याने दिलेला 'फ्लाइंग किस' हा काव्या मारनसाठी असावा, असा अंदाज काही नेटकऱ्यांनी बांधला आहे.

इशान किशनच्या फ्लाइंग किससंदर्भात रंगणाऱ्या चर्चेत अनेकजण आपल्या आपल्या परीने प्रतिक्रिया देताना दिसते. यात एका नेटकऱ्याने त्याचा हा तोरा मुंबई इंडियन्सला आपल्यातील धमक दाखवून देण्याचा एक इशारा होता, असा अंदाज बांधला आहे. व्हायरल होणाऱ्या पोस्टमध्ये इशान किशन याचा फ्लाइंग किस हा काव्या मारनसाठी नाही तर तो मुंबई इंडिन्ससाठी आहे, असे वाटते, अशा अशायाची प्रतिक्रियाही उमटल्याचे पाहायला मिळते, जी सोशल मीडियावर व्हायरलही होतीये.

सनरायझर्स हैदराबादच्या ताफ्यात सामील होण्याआधी इशान किशन मुंबई इंडियन्सच्या ताफ्यातून खेळताना दिसला होता, पण मेगा लिलावाआधी त्याला संघाने नारळ दिला. सनरायझर्स हैदराबादकडून धमाकेदार खेळीसह त्याने मुंबई इंडियन्सच्या संघाने रिलीज करण्याचा निर्णय चुकीचा होता हे ठरवल्याचे दाखवून देतोय, असाही अर्थ या व्हायरल पोस्टमध्ये दडलेला दिसतो.

# धोनीकडून वायूवेगाने स्टम्पिंग, सूर्याही चकित



**चेन्नई : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्स वि. चेन्नई सुपर किंग्स सामना चेपॉकच्या मैदानावर खेळवला गेला. चेन्नईने चेपॉकचा किल्ला अभेद्य राखत मुंबईवर विजय मिळवला. या सामन्यात महेंद्रसिंह धोनीची जबरदस्त स्टम्पिंग पाहायला मिळाली, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

पहिल्याच सामन्यात धोनीने विजेच्या वेगाने स्टम्पिंग करीत सर्वांनाच चकित केले. त्याचे स्टम्पिंग एवढे वेगवान होते की मुंबईचा कर्णधार सूर्यकुमार यादवला त्याचा अंदाजही आला नाही. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे धोनीने अवघ्या ०.१२ सेकंदात बेल्स विखुरल्या. यामुळेच सूर्यकुमार यादवही काही समजण्याआतच बाद झाला होता. तोही धोनीचा वेग पाहून थक्क झाला. ४३ वर्षीय धोनीने आपल्या जुन्या अंदाजात केलेली स्टम्पिंग पाहून त्याच्या फिटनेसचा प्रत्यत येत आहे.

मुंबई इंडियन्सचा संघ सततच्या विकेटने धावफलकावर चांगली धावसंख्या उभारण्याच्या मागे होता. सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी चांगली भागीदारी रचत संघाचा डाव सावरला, पण ११व्या षटकात नूर अहमदच्या चलाखीपुढे आणि धोनीच्या चपळाईपुढे तो फार काळ मैदानावर टिकू शकला नाही.

# बांगलादेशच्या क्रिकेटपटूला मैदानातच हार्ट अटॅक


## रुग्णालयात दाखल



**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेशचा स्टार क्रिकेटपटू आणि माजी कर्णधार तमीम इक्बाल याला ढाका प्रीमियर लीगमध्ये खेळत असताना मैदानावरच हृदयविकाराचा झटका आला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मोहम्मदन स्पोर्टिंग क्लब आणि शिनपुकूर क्रिकेट क्लब यांच्यामध्ये सुरू असलेल्या लढतीदरम्यान ही घटना घडली. मोहम्मदन स्पोर्टिंग क्लबचा कर्णधार असलेला तमीम इक्बाल नाणेफेकीसाठी मैदानात आला होता. त्यानंतर क्षेत्ररक्षणादरम्यान त्याला अस्वस्थ वाटू लागले. वैद्यकीय पथकाने प्राथमिक उपचारांसाठी मैदानात धाव घेतली तसेच त्या ढाका येथे नेण्यासाठी हेलिकॉप्टरलाही पाचारण करण्यात आले, मात्र तमीम याची प्रकृती खूपच चिंताजनक होती तसेच तो हेलिकॉप्टरमध्ये तढण्याच्या स्थितीत नव्हता. अशा परिस्थितीत ढाकाऐवजी त्याला स्थानिक फाजिल तुन्नेस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती नाजुक असल्याचे समजते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com